कष्टकरी जनता, भूषण भारता । वंदन करितो पददलिता ।।

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

संपादक
रामचंद्र मुटाटकर

हाकारा (त्रैमासिक)

कार्यकारी संपादक
ग. शां. पंडित

वर्ष : ३३ वे | **जुलै – सप्टेंबर २०१२** | **अंक : तिसरा**

अनुक्रमणिका

आदिवासी मानव विकास भाग – १

संपादकीय -- २

१) प्रकल्पाची रुपरेषा -- ५

२) तात्त्विक बैठक व दृष्टिकोन : प्रा. रा. के. मुटाटकर -------------------- २५

३) आदिवासी लोकांसाठी काम करताना ---------------------------- २७

४) गावसभेसाठी मार्गदर्शक टिपण : डॉ. पु. सु. आगाशे -------------------- ३२

५) प्रशिक्षणाचे आयोजन व स्वयंसेवकाचा सहभाग कसा असावा ? ------------ ४१

६) शासन–स्वयंसेवी संस्था सहकार्य -------------------------------- ४७

◆ **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
२०१, आकांक्षा रेसिडेन्सी,
औंध, पुणे – ४११ ००७.
टेलिफोन (०२०)२५८९७२९८

अंक मूल्य ४०/– रूपये

◆ **अक्षर जुळणी**
नंदू हि. दिघे
सौ. स्वाती दंडारे

◆ **मुद्रण स्थळ**
ओम एंटरप्राईजेस, पुणे

◆ **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

◆ **संपादक मंडळ :**
ॲड. सुरेखा दळवी
डॉ. मिलींद बोकील
डॉ. शौनक कुलकर्णी

या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

या अंकाच्या प्रकाशनासाठी **भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र** यांचेकडून अनुदान मिळाले आहे.



संपादकीय ......

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागाने जामखेड येथील सर्वांगीण ग्रामीण आरोग्य प्रकल्प व पुणे येथील महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद या दोन संस्थांना संयुक्तपणे महाराष्ट्रातील आदिवासी समाजातील कुपोषण व बालमृत्यू केंद्रीभूत धरुन आरोग्यविषयक आदिवासी उत्थान कार्यक्रम २००४ साली पाच वर्षांच्या कालावधीसाठी मंजूर केला. या कार्यक्रमाच्या निधीची पूर्तता जमेस धरुन, कार्यक्रम मार्च २०१३ पर्यंत वाढविण्यात आला.

महाराष्ट्रातील ७ जिल्ह्यातील ९ आदिवासी बहुल तालुक्यात साधारण २५० गावात अदमासे १.५०-२ लक्ष लोकांसाठी एक मानव विकासाचे प्रतिमान म्हणून कार्यक्रमाची आखणी झाली. कार्यक्रम कर्मचारी वर्गाकडून न राबविता साधारण ५०० आदिवासी महिला व पुरुष ग्रामवासी स्वयंसेवकांकडून राबविण्यात आला. गेल्या ७-८ वर्षात या आदिवासी स्वयंसेवकांचे प्रशिक्षण व कामाचा अनुभव यामुळे त्यांचा मानव विकास झाला, त्या पध्दतीने पुढील २०-२५ वर्षात आदिवासी जनतेचा मानव विकास होऊ शकतो, हे प्रमेय मांडण्यात आले.

आदिवासी विकासाचा विचार आदिवासी जनतेच्या नजरेतून, त्यांना भासणाऱ्या समस्यापूर्तीसाठी व्हावयास हवा. तसेच विकासाचा अर्थ पायाभूत (Infrastructure Development) सोयी सुविधा किंवा जगवण्याच्या योजना नसून शाश्वत मानवविकास, समाजाची आत्मनिर्भर होण्याची क्षमता वाढविणे आहे. यासाठी आदिवासी ग्रामवासी स्वयंसेवकांमार्फत आदिवासी उत्थान कार्यक्रमाची अंमलबजावणी व आखणी करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले.

स्वयंसेवकांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांच्यातीलच काही मार्गदर्शक, आदिवासी सहाय्यक व प्रत्येक तालुक्यासाठी एक पगारी समन्वयक अशी फळी निर्माण करण्यात आली. प्रशासनाचा खर्च एकूण कार्यक्रमाच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त होऊ न देण्याची खबरदारी पाळण्यात आली.

आदिवासी उत्थान कार्यक्रमाची आखणी शासनास प्रस्ताव सादर करताना झालेली असली तरी प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेताना अनेक विकासाभिमुख कार्यक्रम घेण्यात आले. स्वयंसेवकांमार्फत कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी वेळोवेळी कार्यशाळा घेण्यात आल्या. या अंमलबजावणीबाबत नियोजन व प्रत्यक्ष कार्यपध्दतीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी सूचना देण्यात आल्या, पाठ्यक्रम निर्माण करण्यात आले. या साहित्याचा शासनास आणि इतर स्वयंसेवी संस्थांना उपयोग व्हावा या उद्देशाने एका मार्गदर्शिकेचे संकलन करण्यात आले आहे.

आदिवासी उत्थान कार्यक्रम प्रामुख्याने कुपोषण कमी करण्यासाठी आरोग्यविषयक कार्यक्रम असला तरी संस्कृती एकात्मिक असल्याने, संस्कृतीच्या एखाद्या अंगात परिवर्तन करावयाचे झाल्यास इतर अंगातही परिवर्तन करण्याचा सर्वांगीण कार्यक्रम आखावा लागतो. कार्यक्रमाची फलनिष्पत्ती मिळविण्यासाठी ज्या कार्यपध्दतीचा वापर करण्यात येतो, त्यातून परिवर्तनाची एक पध्दती निर्माण होते. या मार्गदर्शिकांच्या माध्यमातून आदिवासी मानव विकासाच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी शासनाच्या आदिवासी विकास विभागास व इतर स्वयंसेवी संस्थांना एक मार्गदर्शन लाभेल असा विश्वास आहे.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची तात्विक बैठक, जनतेच्या नजरेतून, त्यांच्या सांस्कृतिक वारसा व परंपरेतून समस्या समजून त्याची उकल करण्याची आहे. पंडित जवाहरलाल नेहरुंनीही आदिवासी विकासाबाबत पंचसूत्रीच्या शिफारशीत हाच दृष्टिकोण मांडला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या इ. स. २००० पर्यंत सर्वांसाठी आरोग्य या धोरणातही आरोग्याचे प्रश्न समजण्यासाठी व त्यावर तोडगा काढण्यासाठी समाज, संस्कृतीच्या सर्व अंगांची व प्रशासनाच्या सर्व विभागांची एकात्मिक योजना बनणे आवश्यक आहे, तसा प्रयत्न आपण अदिवासी उत्थान कार्याक्रमाची अंमलबजावणी करताना केला आहे.

योजनेची व अंमलबजावणीची मार्गदर्शिका हाकाराच्या दोन अंकात विभागली आहे. पहिल्या अंकात आदिवासी उत्थान कार्यक्रमाची विस्तृत रुपरेषा दिली आहे. तसेच कामाची सुरुवात करताना स्वयंसेवकांची निवड व ग्रामसभेचे आयोजन कसे करावे याचे मार्गदर्शन दिले आहे. शासन व स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्यानेच प्रकल्पाची फलनिष्पत्ती होऊ शकते. प्रत्येक पातळीवर जनतेच्या सक्रीय सहभागाने कार्यक्रम शाश्वत होऊ शकतो. पहिल्या भागात या सर्व बाबींचा ऊहापोह केला आहे.

हाकाराच्या दुसऱ्या अंकात स्वयंसेवक व दाई, गरोदरपण, बाळंतपण, बाळाची काळजी या विषयांवर प्रशिक्षण करण्यासाठी अभ्यासविषयांची माहिती आहे. तसेच अंगणवाडीशी समन्वय साधून स्वयंसेवकाने आपापल्या कार्यक्षेत्रात काय कामे करावयाची व ती कशी करावयाची याबाबत अनुभवातून मार्गदर्शन केले आहे. तसेच बाळाच्या पोषणाबाबतीत व गरोदर, स्तनदा मातांच्या पोषणाबाबत तपशील दिला आहे.

हाकाराचे दोन्ही अंक एकत्रितपणे अशा कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी करण्यास उपयुक्त ठरतील असा आम्हास विश्वास आहे.

प्रा. रा. के. मुटाटकर

आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन पुरस्कृत
आदिवासी उत्थान कार्यक्रम

कार्यक्रम संचालक : प्रा. रा.के. मुटाटकर
डॉ. रजनीकांत आरोळे (सन २००४ ते २०११)
डॉ. शोभा आरोळे (सन २०११ ते २०१३)

● कार्यक्रमातील (प्रकल्पातील) सहभागी व्यक्ती ●

मध्यवर्ती कार्यालय

श्री. गणपत पंडित, प्रकल्प समन्वयक
डॉ. पुरुषोत्तम आगाशे (२००४-०७)
डॉ. लक्ष्मीकांत नागापुरे (२००४-०५)
श्री. प्रवीण कसोटे (२००६)
डॉ. संजय डाखोरे (२००७-०८)
कु. सुवर्णा कारेलिया (२००५-०६)
डॉ. शैलेश दळवी, प्रकल्प समन्वयक
डॉ. कल्पना मुटाटकर (२००७-०९)
डॉ. मुकुंद पांडे (२००४-०५)
श्री. बाळासाहेब भेके (२००७-०९)
श्री. सुशील कहात (२००७-२०११)
श्री. जे. जे. डांगे (अकाऊंटंट)

● कार्यक्षेत्रे व समन्वयक / सहाय्यक ●

१) **जव्हार, जि. ठाणे –** श्री. मुश्ताक कोतवाल, श्री. उमेश सपकाळे
२) **मोखाडा, जि. ठाणे –** श्री. विलास पाटील
३) **कर्जत, जि. रायगड –** श्री. माधव मठपती, श्री. मुरलीधर पाटील
४) **अकोले, जि. अहमदनगर –** श्रीमती रत्नाताई कांबळे, श्री. सुधीर तेलोरे, श्री. गणपत खाडे
५) **धडगाव, जि. नंदूरबार –** श्री. रोहिदास पावरा, श्री. विठ्ठल कदम, श्री. मानसिंग राहसे
६) **अक्कलकुवा, जि. नंदूरबार –** श्री. गणपत वसावे, श्री. करणसिंग पाडवी
७) **धारणी, जि. अमरावती –** श्री. ओमप्रकाश वाघमारे, श्री. संतोष व्यवहारे, श्री. नरेश पानझाडे
८) **झरीजामणी, जि. यवतमाळ –** श्री. भरत खंदारे, श्री. अय्या आत्राम, श्री. वासुदेव तोडसाम
९) **एटापल्ली, जि. गडचिरोली –** श्री. राकेश दुर्गे, श्री. नंदू नरोटे, श्री. महेश डोनारकर, श्री. सोमजी पल्लो, स्व. के.एन. खापने

● वाहन चालक ●

विलास जाधव (२००४-१२) अकील सय्यद (२००४-०९) सुजित घुले (२०१२ ते २०१३)

महाराष्ट्रातील आदिवासी लोकांचा सर्वांगीण व शाश्वत विकास प्रकल्पाची रुपरेषा

१. प्रस्तावना

१.१ पार्श्वभूमी

महात्मा गांधींच्या आदिवासी विकास धोरणानुरुप त्यांचे रचनात्मक कार्यक्रम आणि पंडित जवाहरलाल नेहरुंच्या आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठीच्या पंचशील कार्यक्रमानुसार, भारताचा एकात्मिक आदिवासी विकास विभाग व आदिवासी उपयोजनांची निर्मिती झाली. आदिवासी विकासाच्या अनेक योजना राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा पातळीवर संबंधित विभागांकडून प्राथमिकतेने राबविल्या जातात. ७३ व्या घटना दुरुस्तीने आदिवासी ग्रामसभेला विशेष अधिकार देऊन सुध्दा आदिवासी क्षेत्रातील पंचायत राज संस्था पूर्ण क्षमतेने कार्यान्वीत नाहीत. जवळपास संपूर्ण आदिवासी जनता ही दारिद्र्य रेषेखाली आहे. ह्यातून मानवी विकास व समता यांचा मुद्दा पुढे येतो.

प्रस्तावीत प्रकल्प हा महाराष्ट्रातील ७ जिल्ह्यांत ज्यामध्ये ८०% लोकसंख्या आदिवासी आहे. त्यातील निवडक तालुक्यांमधील व विशेषत्वाने आदिम जमातींना केंद्रिभूत मानून शाश्वत मानवी विकासाचे प्रतिमान विकसीत करण्यासाठी आहे. महाराष्ट्र राज्य मानव विकास अहवाल २००२ मध्ये नंदूरबार व यवतमाळ हे दोन आदिवासी जिल्हे मानवी विकास निर्देशांकानुसार मागासलेले जिल्हे म्हणून निर्देशित केले आहेत. दारिद्र्य, कुपोषण आणि बालमृत्यू यांचे मोठे प्रमाण लक्षात घेता, सर्वांगीण विकासाच्या कृति निवडक आदिवासी क्षेत्रामध्ये एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या बरोबरीने करणे प्रस्तावीत केले आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण लोकसंख्येच्या ९% लोकसंख्या आदिवासी अनुसूचित जमातींची आहे. शेकडो वर्षांच्या भौगोलिक अलगतेमुळे काही जमाती विकासाच्या दृष्टीकोनातून कुंठित अवस्थेत आहेत, त्यांना आदिवासी म्हणतात. आदिवासींना बऱ्याचवेळा मागासलेले म्हणतात, म्हणजे त्यांच्यामध्ये विकासाच्या संधी उपलब्ध असताना त्याचा उपयोग करण्याची क्षमता नसते. आदिवासी विकासामध्ये कळीचा मुद्दा हा त्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे, हा नसून त्या सुविधांबरोबरच त्यांचा वापर करण्याची क्षमता इतर नागरिकांप्रमाणे निर्माण करणे हा आहे.

महाराष्ट्रातील आदिवासी समाजातील जमातींमध्ये वेगवेगळ्या पातळीवर मागासलेपणा दिसून येते. माडिया गोंड, कोलाम व कातकरी हे आदिम जमातीचे गट विकासाच्या पातळीवर तळाला आहेत. त्याचप्रमाणे नंदूरबारमधील अक्कलकुवा व अक्राणी (धडगाव) भागातील भिल्ल जव्हार, मोखाडा भागातील वारली व ठाकूर आणि अमरावती भागातील कोरकू हेही तितकेच मागासलेले आहेत. याकरिता प्रस्तावीत प्रकल्पाचे कार्यक्षेत्र निवडताना वरील बाबींचा विचार केला आहे.

महात्मा गांधींनी आदिवासी विकासाला त्यांच्या अनेक रचनात्मक कार्यामध्ये अग्रक्रम दिला आहे. यापासून प्रेरणा घेऊन श्री. वेरीअर एल्विन यांनी अनेक

वर्षे आदिवासी क्षेत्रात राहून त्यांच्यावर लेखन केले आणि भारत सरकारला आदिवासी विकासाबाबत सल्ला दिला. पं. जवाहरलाल नेहरु यांनी श्री. एल्विन यांच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत आदिवासी विकासासंदर्भात पंचशिल सूत्रे सांगून एक-खिडकी प्रशासनावर भर दिला आहे. याबरोबरच श्री. यु. एन. ढेबर आयोगाच्या सूचनांनुसार भारताचे एकात्मिक आदिवासी विकास धोरण तयार झाले आहे.

१.२ सर्वांगीण दृष्टीकोन : संकल्पना व तंत्र

आदिवासी समाजात असणाऱ्या गरिबीची तुलना नेहमी शेती समाजातील गरिबीशी केली जाते. आदिवासी समाजातील गरिबी व कुपोषणाची प्रकर्षाने जाणवण्यास सुरुवात झाली, ती जंगल विकास धोरणामुळे. त्यांना जंगलातील पारंपरिक अन्न-साठा मिळेनासा झाल्यामुळे. आदिवासी संस्कृती अन्नसंकलनाची आहे, पीक निर्मितीची नाही. त्यामुळे जमीन हे उपजिविकेचे साधन व संपत्ती मानणे ही अलीकडच्या काळातील संकल्पना आहे. आदिवासींच्या पीक घेण्याच्या आदिम पध्दतीमुळे त्यांच्या अन्न सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. दीर्घकालीन गरीब परिस्थितीमुळे गरिबीची संस्कृती निर्माण झाल्याने येणारा न्यूनगंड ही त्यांच्या अस्मितेवर घाला घालणारी आहे. ज्याप्रमाणे दलित समाजातील लोकांना अस्पृश्याची वागणूक मिळते, अशी वागणूक आदिवासींना मिळत नाही. आदिवासींच्या विशिष्ट संस्कृतीमुळे त्यांच्या पारंपरिक कला व साहित्यात ती प्रतिबिंबित होते. ते त्यांची सांस्कृतिक अस्मिता टिकवत आर्थिक विकासाकरिता झगडत असतात. उदरनिर्वाह, आरोग्य व शिक्षण ह्या बाबी आदिवासी विकासामध्ये कळीचा मुद्दा आहेत.

संस्कृती ही सर्वांगीण असते. परंपरेतून निर्माण झालेली संस्कृती ही अविभाज्य असते आणि सहसा विभागनिहाय विकासाचा दृष्टिकोन ठेऊन बदलत नाही. याकरिता विकासाचे प्रयत्न हे सर्वांगीण असावयास हवेत. सारासार विचार करता प्रत्येक क्षेत्राचा विकास करताना इतर क्षेत्रांमध्ये सुध्दा कृति केल्यास सर्वांगीण विकास होऊ शकतो. सामाजिक आरोग्य संघटनेच्या सर्वांसाठी आरोग्य या धोरणानुसार प्राथमिक आरोग्याच्या दृष्टीने विविध क्षेत्रे जसे की, कृषि, पशुपालन, शिक्षण, दळणवळण, विद्युत, शुद्ध पाणी, स्वच्छता इ. मध्ये अंतर विभागीय समन्वय असणे गरजेचे आहे. सर्वांगीण ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड यांनी अंगीकारलेल्या दृष्टीकोनानुसार समता, एकीकरण, सबलीकरण आणि सुयोग्य तंत्रज्ञान यांच्या पासून सर्वांगीण विकास होतो. ह्याच धर्तीवर आदिवासी भागाचा विकास करण्याचा प्रयत्न भंडारदरा, जि. अहमदनगर या आदिवासी भागात ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड यांनी यशस्वी केला. सर्वांगीण ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेडच्या विकासाच्या कामाची सुरुवात आरोग्यापासून होते, तर काहीसाठी ही सुरुवात शिक्षणापासून होते; तर बायफ साठी उदरनिर्वाहापासून सुरुवात होते.

संस्कृतीच्या सर्व घटकांमधील कृतिंचा वापर केला तर सांस्कृतिक आणि सामाजिक बदल सुकर होतात व सांस्कृतिक समतोल बिघडत नाही.

शैक्षणिक क्षेत्रामध्ये मानवशास्त्र हे मानवाचा सर्वांगीण अभ्यास करणारे शास्त्र आहे. हे शास्त्र विकसीत झाले आहे ते जगभरातील सर्व आदिम समाजांचा अभ्यास करुन. सांस्कृतिक एकात्मिकरणाचा सिध्दांत आणि संस्कृती म्हणजे सर्वव्यापी संस्था जिचा सांस्कृतिक बदलावर होणारा परिणाम ही या अभ्यासाची फलनिष्पत्ती आहे. सांस्कृतिक सर्वव्याप्तिचा सिध्दांत

शासनाच्या एकात्मिक विकासाच्या धोरणातून प्रदर्शित होतो. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे या सिध्दांताचे आदिवासी विकासाकरिता समर्थन करत असते. या कार्यक्रमाचा प्रस्ताव हा याच धोरणानुसार सर्वांगीण मानव विकासाच्या दृष्टीने तयार केला आहे.

१.३ सर्वांगीण ग्रामीण आरोग्य प्रकल्पाचा दृष्टीकोन

सर्वांगीण ग्रामीण आरोग्य प्रकल्प सुरु झाला तो वरील सत्यता लक्षात घेऊन. ग्रामीण जनतेच्या आरोग्य गरजा पूर्ण करण्यासाठी संस्थेने सर्वांगीण, समाजाधिष्ठीत प्राथमिक आरोग्य सेवेचा दृष्टीकोन विकसित केला आहे. ग्रामीण आरोग्य प्रकल्प जामखेड येथे स्थित असून हा भाग दुष्काळी व गरीब आहे.

संस्थेचा एक मुख्य हेतू हा गरीब आणि वंचितांकडे पोहोचणे व त्यांचे आरोग्य सुधारणे हा आहे. जागतिक पातळीवर सर्वांना सारखे आरोग्य प्राप्त होणे शक्य नाही. जनतेला गरजेनुसार योग्य आरोग्य सेवा मिळण्याची खात्री देता येणे शक्य आहे. ह्या संकल्पनेला आरोग्य समता म्हणतात व तेच ग्रामीण आरोग्य प्रकल्पाचे मुख्य सूत्र आहे.

आरोग्य म्हणजे केवळ आजारापासून मुक्ती नसून सामाजिक, आर्थिक, आत्मिक, शारीक व मानसिक स्वस्थता होय. हा सर्वांगीण आरोग्याचा विचार समजावून घेऊन, या प्रकल्पामध्ये सामाजिक-आर्थिक सुधारणेवर लक्ष केंद्रित केले आहे. आरोग्य एकाकी अस्तित्वात येऊ शकत नाही. आरोग्याचा शिक्षण, पर्यावरण, स्वच्छता, सामाजिक व आर्थिक स्तर व कृषि याबरोबर संबंध आहे. याकरता या क्षेत्रामध्ये सुधारणा झाल्यास आरोग्य सुधारते. आरोग्य सेवेमध्ये प्रबोधन, प्रतिबंध, उपचार आणि पुनर्वसनाच्या बाजू येतात. या सर्व दृष्टीकोनांच्या एकीकरणानेच प्रभावी आरोग्य सेवा निर्माण होऊ शकते.

ग्रामीण आरोग्य रक्षक आणि समाज गटामध्ये गाव पातळीवर काम केल्याने स्त्रिया व समाजाचे एकंदरच सक्षमीकरण होत असते. हा समाजाधिष्ठीत आरोग्य सेवेचा अत्यंत महत्त्वाचा दृष्टिकोन आहे. एकदा लोकांना ज्ञान मिळाले आणि त्याद्वारे ते निर्णय घेऊ शकले तर त्यांना त्याद्वारे रचनात्मक पध्दतीने सामाजिक बदल घडवून आणण्याचे बळ मिळते.

ग्रामीण भागातील बहुतांश आरोग्य समस्या किरकोळ असतात. मात्र याच समस्यांना योग्यवेळी ओळखून प्रतिबंध नाही केला तर गंभीर स्वरुप धारण करुन मृत्यूचे कारण बनू शकतात. बहुतांशी या समस्या प्रतिबंधन करण्यासारख्या असून आरोग्याच्या दृष्टीने हा प्रतिबंध महत्त्वाचा आहे.

प्रकल्प सुरु झाला तो ग्रामीण भागातील गरजा आणि उपलब्ध साधनसंपत्तीचा अनुरुप आरोग्य सेवा कार्यक्रम विकसीत करण्यासाठी. प्रकल्पाचे मूलभूत तत्व हे सामाजिक सहभागातून प्रकल्पाच्या कृतिंचे नियोजन करणे आहे.

अ) आरोग्य सेवेतील प्राथमिकता

१) गाव पातळीवर संपूर्ण वेळ सोपी लक्षणाधिष्ठीत प्राथमिक सेवा उपलब्ध करणे.

२) गरोदर माता, स्तनदा माता व बाळंतपणाची योग्य काळजी.

३) शाळा पूर्व वयोगटातील मुलांची काळजी घेणे.

४) कुटुंब नियोजन

५) क्षयरोग, कुष्ठरोगासारख्या दीर्घ मुदतीच्या आजारांवर नियंत्रण.

६) अंधत्व प्रतिबंध

ब) एकात्मिक ग्रामीण विकास

१) पशु आरोग्य सेवा

२) उत्पन्न निर्मिती कार्यक्रम, विशेषत्वाने स्त्रियांकरिता

३) पाणलोट विकास

४) स्वच्छ पर्यावरण, सुरक्षित पिण्याचे पाणी व स्वच्छतेची हमी

५) अनौपचारिक शिक्षण

६) पर्यायी उर्जा-स्त्रोत

७) सामाजिक वनीकरण

हे सर्व मिळवण्याकरिता 'लोकांचे आरोग्य लोकांच्या हातात' या तत्वाचे अनुसरण केले आहे. समाजाने निवडलेली स्त्री ग्रामीण आरोग्य रक्षिका/कार्यकर्ता आणि समाज गट, जसे की शेतकरी मंडळ, महिला मंडळ आणि बाल मंडळ यांनी पर्यायी तंत्रज्ञानाचा वापर करुन हे बदल घडवून आणावयाचे आहेत.

१.४ महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचा दृष्टिकोन

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची स्थापना ही मानवशास्त्राचे विज्ञान आणि संशोधन पध्दती लागू करण्यासाठी झाली आहे. मानव शास्त्रामध्ये मानवाचा संस्कृती आणि पर्यावरणाच्या विविध अंगांनी अभ्यास करणाऱ्या सर्व शाखांचा अंतर्भाव होतो.

विकासाच्या प्रक्रियेत ऐतिहासिक उत्क्रांत झालेल्या मानवी संस्थांमुळे गरिबी, आजार, शोषण आणि वंचितपणा निर्माण झाला आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षण यानी लोकांमधली दरी होण्याऐवजी वाढतच आहे.

उद्दिष्ट्ये :

१) लोक सहभागातून मानवी विकास साधण्याकरिता विविध सामाजिक घटकांमध्ये व आरोग्यामध्ये संशोधन प्रकल्प हाती घेणे.

२) शासन, स्वयंसेवी संस्था व इतर शैक्षणिक संस्थांना समाजाधिष्ठित संशोधन पध्दतीविषयक प्रशिक्षण साहित्य पुरविणे.

३) चर्चासत्र, कार्यशाळा आणि प्रकाशनातून विकासाचे प्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांना विकासाचा सर्वांगीण दृष्टिकोन देणे.

४) गरीब व पददलितांचा विकास आणि उत्थानाचा हेतू अंगीकारुन काम करणाऱ्या संस्थांना मार्गदर्शन करणे.

कृति कार्यक्रम :

म. मा. वि. प. आपल्या कार्यक्रमाद्वारे धोरण कर्ते, शासकिय कर्मचारी, कार्यकर्तेआणि शैक्षणिक क्षेत्रातील लोकांना संस्कृती, पर्यावरण, आरोग्य, शिक्षण या विकासाच्या मुद्द्यांवर विचार विनिमय करण्यासाठी एका व्यासपीठावर आणते

- मुल्यमापनात्मक संशोधन
- सुसाध्यता अभ्यास
- परंपरा, संस्कृति आणि स्थानिक इतिहास
- वांशिक विज्ञान आणि स्थानिक ज्ञान
- विकास संज्ञापन
- दारिद्र्य रेषेखालील लोकांकरिता कार्यक्रम
- जंगल आणि पर्यावरण
- आदिवासी अस्मिता

- आरक्षण प्रश्न
- जैव-सांस्कृतिक प्रश्न आणि आरोग्य, एच. आय. व्ही. आणि अतिसार यांचा संबंध.
- प्रजनन आरोग्य
- अन्न आहार व पोषण
- अनौपचारीक व प्रौढ शिक्षण

हे काही कृतिकार्यक्रम आहेत.

१.५ संलग्न संस्था (अंमलबजावणी करणाऱ्या)

सर्वांगीण ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड :

हा डॉ. राज आणि डॉ. मेबल आरोळे यांनी १९७० साली सुरु केला. प्रचलीत आरोग्य सेवा-प्रामुख्याने रुग्णालयातील उपचार किंवा पाश्चिमात्य पध्दतीवर आधारित रुग्णालयाने सामान्य जनतेचे किंवा समाजाचे आरोग्य सुधारणार नाही. त्यांना एक नविन दृष्टीकोन निर्माण करण्याची गरज वाटली. समाजाधिष्ठीत आरोग्य सेवा आणि विकास-हा ग्रामीण आरोग्य प्रकल्पाचा पाया आहे. लोकांचे आरोग्य लोकांच्या हाती देण्यासाठी लोकांना सक्षम बनवणे हा आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीपासून विविध गावातील लोक सामील होते आणि त्यांनी प्रकल्पाच्या कामात लोकांबरोबर सक्रिय सहभाग घेतला. समता, एकात्मता आणि सक्षमीकरण या तत्वावर आधारीत स्त्री व दुर्लक्षीत सामाजिक गटांचा विकास हे या प्रकल्पाचे काम होय. या दृष्टीकोनाने लोकांचा सर्वांगीण विकास झाला व त्या बरोबरच आरोग्य विकास पण झाला.

ग्रामीण आरोग्य प्रकल्पामध्ये सुरुवातीला आठ खेडी सहभागी होती. १९८० सालापर्यंत याचा झपाट्याने विस्तार होऊन ७० खेडी व १ लक्ष लोकसंख्या इतका झाला. १९८५ पर्यंत कर्जत व जामखेड तालुका सहभागी झाल्याने प्रकल्पाची व्याप्ती २५० खेडी व २.५ लक्ष लोकसंख्या इतकी झाली. याव्यतिरिक्त नगर जिल्ह्यामधील भंडारदरा या एका आदिवासी क्षेत्रात ३० गावे आणि ५०,००० लोकसंख्येत प्रकल्प, हे एक बोधक उदाहरण आहे, रुग्णालयाच्या आधाराशिवाय आरोग्य सुधारता येते.

१९९३ साली जामखेड पासून १५० कि. मी. अंतरावर असलेल्या लातूर येथे भीषण भूकंप झाला. यावेळी गावकऱ्यांनी स्वेच्छेने बाधीतांची सेवा केली. या सर्वाचा परिणाम म्हणून त्याठिकाणी २० गावांत, २५,००० लोकसंख्येत हा कार्यक्रम सुरु झाला. सध्याच्या काळात आष्टी तालुक्यात हे काम सुरु आहे, ज्यामध्ये ३० गावांत ५०,००० लोक संख्या सामील आहे. आता ग्रामीण आरोग्य प्रकल्पाचे काम एक लक्ष लोकसंख्येत जामखेड व भंडारदरा येथे सुरु आहे.

प्रकल्पाच्या सुरुवातीपासून ४०० गावातील, ५ लक्ष लोक अहमदनगर, बीड व उस्मानाबाद या जिल्ह्यांतील स्वत:चे आयुष्य बदलण्यास ग्रामीण आरोग्य प्रकल्पाच्या मदतीने सक्षम झाले आहेत.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची नोंदणी १९७६ साली पुणे येथे झाली. १९७५ च्या नोव्हेंबर महिन्यात, पुणे विद्यापीठातील समाज शास्त्र व मानवशास्त्र या संयुक्त विभागात महाराष्ट्रातील विद्यापीठ शिक्षकांच्या बैठकीत महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद स्थापण्याचा निश्‍चय झाला. श्री.अनंतराव बोधनकर, पहिले कार्यकारी संचालक, आदिवासी विकास महामंडख व पहिले मुख्य संशौधन अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था हे या बैठकीचे अध्यक्ष होते.

श्री. व्ही. बी. मंडलेकर, भा. प्र. से. आदिवासी विकास विभागाचे चे पाहिले सचिव व आदिवासी आयुक्त, हे संस्थेचे पहिले अध्यक्ष होते. प्रा. रा. के. मुटाटकर यांनी पुणे विद्यापीठात मानवशास्त्र विभाग १९६३ साली आणि स्कूल ऑफहेल्थ सायन्स १९९१ साली सुरु केला. ते याचे पहिले संस्थापक सचिव होते व आता अध्यक्ष आहेत. या संस्थेचे अध्यक्षपद विभूषीत केलेल्या इतर मान्यवरांमध्ये स्व. प्रा. गं. बा. सरदार, स्व. प्रा. पा. वा. सुखात्मे (पद्मभूषण), स्व. जनार्दन महाराज वळवी, (शिक्षणप्रसारक व समाजसुधारक) आणि स्व. प्रा. ए. आर. कुलकर्णी, अध्यक्ष, भारतीय इतिहास संशोधन मंडळ व कुलगुरु, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद १९८० पासून आदिवासींच्या प्रश्नांशी निगडीत त्रैमासिक 'हाकारा' प्रकाशित करते आहे. याला साहित्य संस्कृती मंडळाकडून 'अ' दर्जा देण्यात आला आहे. परिसंवाद, कार्यशाळा आणि प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थी व समाजसेवकांना प्रशिक्षित करुन महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद महाराष्ट्रातील बहुतेक आदिवासी क्षेत्रांत तळागाळात काम आरोग्य आणि विकासासाठी काम करते आहे.

प्रा. रा. के. मुटाटकर हे अनेक वर्ष शासकिय आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेचे अशासकीय सदस्य होते. याबरोबरच महाराष्ट्र शासनाच्या मागासवर्ग समितीचे अध्यक्षपद, राज्य शासनाच्या मागासवर्ग आयोगाचे सदस्यपद, खरे आदिवासी ओळखण्यासाठी जसे हलबा-हलबाकोष्टी, गोवारी-गोंड गोवारी, बंजारा-वंजारी इ. समित्यांचे सदस्यपद भूषविले आहे. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदने संशोधक, प्रशासक, राजकीय कार्यकर्ते, तळागाळात काम करणारे सामाजिक कार्यकर्तेव ज्यांचा आदिवासी क्षेत्रामध्ये व लोकांशी प्रत्यक्ष संबंध आहे अशांना एक व्यासपीठ दिले आहे. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदने, बायफ सारख्या संस्थेस उदरनिर्वाहाच्या प्रकल्पामध्ये प्रशिक्षण, मुल्यमापन, पायाभूत सर्व्हेक्षण स्वरुपात मदत केली आहे.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद व सर्वांगीण ग्रामीण आरोग्य प्रकल्प या दोन्ही संस्था एकमेकांना पूरक दृष्टिकोन आणि अनुभवाद्वारे आदिवासी विकासासाठी तयार आहेत. ग्रामीण आरोग्य प्रकल्प आणि महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद एकत्रितपणे शासनाच्या बरोबर भागीदारीत महाराष्ट्रातील आदिवासी लोकांच्या मानवी विकासाबाबत कटिबध्द आहेत.

२. कार्यक्रमाच्या संकल्पना

२.१ आदिवासी

भारतामध्ये एकूण लोकसंख्येच्या ८% लोकसंख्या आदिवासी आहे. महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येत ९.३% लोक-संख्या आदिवासी असून १५ जिल्ह्यांत पसरलेली आहे. राज्यामध्ये ४७ आदिवासी जमाती आहेत. आदिवासी डोंगर-दऱ्या व जंगलातील पठारामध्ये राहतात आणि मुख्य प्रवाहापासून केले असतात.

महाराष्ट्रातील मुख्य आदिवासी जमातींमध्ये भिल्ल, गोंड, महादेव कोळी, कोकणा, पावरा, ठाकर आणि वारली आहेत. आदिवासी मधील तीन जमाती; कोलाम (यवतमाळ जिल्हा), माडिया गोंड (गडचिरोली जिल्हा) आणि कातकरी (ठाणे व रायगड जिल्हा) हे भारत सरकारद्वारे (पी.टी.जी.) आदिम जमाती म्हणून गणल्या गेल्या आहेत.

महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येतील साधारणत: ५०% लोकसंख्या आदिवासी उपयोजना

क्षेत्रात राहते. यापैकी ८०% लोकसंख्येतील प्रत्येक कुटुंबांचे उत्पन्न २०००/- पेक्षा कमी आहे. ५०% कुटुंबे ही शेतीवर अवलंबून आहेत. २०% कृषीक्षेत्रात मजूर, ४०% जंगल क्षेत्रात मजूर आणि १०% सेवा क्षेत्रात आहेत. यांच्या उत्पन्नापैकी ७७% भाग हा अन्नावरती आणि ८% कपड्यावर खर्च होतो. जळपास ४४% कुटुंबे भूमीहीन आहेत आणि ११% कुटुंबांकडे १ हेक्टर पेक्षा कमी जमीन आहे. ९०-९५% कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली आहेत. जवळपास १५०० गावे ही रस्त्याने जोडलेली नाहीत. त्यामधील बहुतांशी गडचिरोलीमध्ये आहेत. भागरागड आणि एटापल्ली विभागातील ६७३ पैकी २६८ गावे दुर्गम आहेत.

२.२ महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती

महाराष्ट्रातील आदिवासींच्या शोषणाचा प्रश्न फार जुन्या काळापासून असून त्याचे प्रर्तिबिंब हे वारली लोकांनी जमीनदार व सावकारांविरुद्ध श्रीमती गोदावरी परुळेकरांच्या नेतृत्वाखालील केलेल्या उठावामधे आहे. त्यांच्या वारली उठाव आणि सबलीकरणा वरील 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकास साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. शिक्षण सुधार आणि जंगल मजूर सहकारी सोसायटी विकसीत करण्याचे प्रयत्न श्री. बी. जी. खेर यांच्या नेतृत्वाने झाले. (हे मुंबई प्रांताचे तत्कालीन मुख्यमंत्री होते, भारत सरकार १९३५ कायद्यान्वये) श्री. खेर आणि त्यांचे सहकारी आचार्य भिसे यांनी गांधीतत्वावर आधारीत भिल्ल सेवा मंडळ, डांग सेवा मंडळ व इतर स्वयंसेवी संस्था निर्माण केल्या.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. महाराष्ट्रामध्ये १९७५-७६ साली आदिवासी विकास विभाग हा समाजकल्याण विभागापासून वेगळा करण्यात आला. श्री. व्ही. बी. मंडलेकर यांची आदिवासी विकास विभागाचे पहिले सचिव तथा आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेची स्थापना १९६२ साली झाली. काही आदिवासी भागातील प्रभागांचा अंतर्भाव सार्वजनिक विकास कार्यक्रमात करुन आदिवासी विकास विभागाची सुरुवात झाली. आदिवासी विकास विभागातला मोठा अडथळा म्हणजे आदिवासी व जंगल खात्यातील बिघडते संबंध. आदिवासी विकास व वनखाते एकाच मंत्रीपदाकडे देऊनही हा कारभार सुधारला नाही. आदिवासीकडून होणारी वनशेती हा गुन्हा धरला गेल्याने यावरुन आदिवासी व वनखात्यात बेबनाव निर्माण झाला.

२.३ आदिवासी उप-योजना

भारत सरकारच्या निर्देशाप्रमाणे १९७५ साली ज्या खेड्यांमध्ये आदिवासी लोकसंख्या ५०% पेक्षा जास्ती आहे, तिचा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पात समावेश करण्यात आले. याप्रमाणेच ज्या खेड्यांमध्ये आदिवासी लोकसंख्या ५०% पेक्षा थोडी कमी असेल अशा खेड्यांचा अंतर्भाव अतिरिक्त आदिवासी उपयोजना गटात करण्यात आला. काही विभागामध्ये ए. आ. वि. प्र. च्या बाहेर आदिवासी लोकसंख्या केंद्रित झाली होती. याकरीता अशा गावांच्या गटामध्ये ज्या गावांची लोकसंख्या १०,००० असून त्यामध्ये ५०% पेक्षा जास्ती आदिवासी लोकसंख्या असेल तर त्याला (MADA) माडा अंतर्गत घेतले आहे. त्याचप्रमाणे २-३ गावांची लोकसंख्या ५,००० असून त्यामध्ये ५०% पेक्षा जास्ती आदिवासी असतील तर त्याला मिनी माडा मध्ये घेतले आहे. महाराष्ट्र राज्यात २४ ए. आ. वि. प्र., ४३ माडा विभाग, आणि २४ मिनी माडा विभाग आहेत.

१९९१ च्या जनगणनेनुसार ४९% आदिवासी लोकसंख्या ही ए. आ. वि. प्र. क्षेत्रात राहाते आणि ५१% या क्षेत्राच्या बाहेर आहेत. जे अदिवासी ए. आ. वि. प्र. क्षेत्राच्या बाहेर राहतात त्यांना फक्त वैयक्तिक लाभाच्या व कौटुंबिक योजना जशा शिष्यवृत्ती वगैरेंचा लाभ मिळू शकतो.

आदिवासी उपयोजना ९ व्या पंचवार्षीक योजनेपासून कार्यरत असून सुध्दा आदिवासी क्षेत्रामध्ये किंवा आदिवासी समाजामध्ये मानण्यइतपत विकास झाल्याचे दिसत नाही. नंदूरबार जिल्ह्यामध्ये ७५% कुटुंबे दारिद्रय रेषेखाली आहेत, तर आदिवासी बहुल चार तालुक्यांतील ९५% कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली आहेत.

भारत सरकारच्या धोरणानुसार दहावी पंचवार्षीक आदिवासी उपयोजना २००२-२००७ पर्यंत कार्यरत आहे. आदिवासी उपयोजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१) आदिवासी कार्यक्षेत्र आणि इतर कार्यक्षेत्रामधील विकासामध्ये समतोल राखून दोन्ही क्षेत्रातील दरी कमी करणे.

२) आदिवासी लोकांचे जीवनमान उंचावणे.

३) आदिवासी लोकांच्या मुख्य समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे.

४) आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक विकासाला गती देणे.

आदिवासी उपयोजना तयार करण्याची पध्दती समजावून घेणे, उपयोजना कार्यान्वीत करणे आणि आदिवासी विकास विभागाचा त्यामधील सहभाग दाखवणे या करिता राज्य शासनाने १९९२ साली श्री. द.म. सुखटणकरांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. या समितीचा अहवाल मान्य झाला आहे. या समितीच्या लक्षात आले की, नियोजन खाते हे उपयोजनेतील योजना स्वेच्छेनुसार आणि प्राथमिकतेनुसार राबवण्यास सांगते. या कारणास्तव जी खाती क्षेत्र विकासाची आहेत ती आदिवासी विकासातील अर्थतरतूद वापरुन सिंचन व वीज निर्मितीचे मोठे प्रकल्प राबवते. या सर्वांचा परिणाम म्हणजे आदिवासी विकासासाठीचा निधी आदिवासी जनतेचा विकास व जीवनमान न उंचावताच संपत असे. याकरीता सुखटणकर समितीने आदिवासी विकास विभागानेच नियोजन खात्याची भूमिका बजावून अंदाजपत्रकाचा मोठा भाग हा जिल्हा पातळीवर नियोजीत करण्याची सूचना केली. एकूण तरतुदी मधील ७५% रक्कम ही ए. आ. वि. प्र. क्षेत्रामधील लोकांचा विकास व २५% रक्कम ही या क्षेत्राबाहेरील आदिवासी विकासाकरता वापरण्याची शिफारस आहे.

आदिवासी उपयोजनेतील बहुतांश योजना या जिल्हास्तरावरील आहेत. विकास धोरणातील महत्त्वाचे घटक जवाहर रोजगार योजना, रस्ते, शिक्षण, आरोग्य, ग्रामीण पाणी पुरवठा, मागासवर्गाचे संवर्धन आणि पोषण होय. नवसंजीवन योजना ही एक महत्त्वाची एकात्मिक विकासाची योजना आहे, ज्यामध्ये मानवी विकासाचे सर्व घटक येतात.

२.४ आदिवासी उत्थान कार्यक्रमाचे ध्येय

आदिवासी लोकांच्या जीवनाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने एकात्मिक आदिवासी विकासाचे एक प्रतिमान विकसित करणे.

२.५ विशिष्ट उद्दिष्टे

१) गावपातळीवर माता बालकांमधील आजार मृत्यू आणि साथीचे आजार कमी करण्याच्या हेतूने

प्रतिबंधात्मक, आरोग्यवर्धन आणि आरोग्य सेवा विकसीत करणे.

२) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण आणि व्यवसाय शिक्षण उपचोरात्मक /प्रस्थापीत करणे.

३) अन्नाची पूर्तता आणि पोषण मिळण्याच्या दृष्टीने उदरनिर्वाहाची साधने विकसीत करणे.

४) समाज आणि पंचायत राज संस्थांचे सर्वांगीण विकासाच्या संधी आणि पध्दतींचे माहिती प्रसाराद्वारे सबलीकरण करणे.

५) आदिवासींमध्ये आत्मसन्मान, सांस्कृतिक अस्मिता आणि राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लावणे.

२.६ प्रस्तावित प्रकल्पाचे क्षेत्र

१९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रामध्ये ८०% पेक्षा जास्ती आदिवासी लोकसंख्या असणारे १२ तालुके आहेत आणि ७०% पेक्षा अधिक आदिवासी लोकसंख्या असणारे ४ तालुके आहेत. इतर जिल्ह्यांमध्ये काही विशिष्ट क्षेत्रांमध्ये आदिवासी लोक अधिक संख्येत आहेत. प्रस्तावीत प्रकल्प क्षेत्रे ही ए. आ. वि. प्र. च्या क्षेत्राखाली येतात. गाव व क्षेत्रे पुढील तालुक्यांमधून निवडली आहेत.

जिल्हा	तालुका	आदिवासी लोकसंख्या (%)
ठाणे	जव्हार	८८%
	मोखाडा	९३%
नंदूरबार	अक्कलकुवा	८१%
	अक्राणी (धडगाव)	८६%
अमरावती	धारणी किंवा चिखलदरा	७५%
अहमदनगर	अकोले	४६%
गडचिरोली	एटापल्ली किंवा	८१%
	भामरागड	८४% माडीया गोंड आदिम जमात क्षेत्र
यवतमाळ	झरी-जामणी	४०% कोलाम आदिम जमात क्षेत्र
रायगड	कर्जत किंवा	२२% कातकरी आदिम जमात
	सुधागड	३०% कातकरी आदिम जमात क्षेत्र

२.७ कार्यक्रम किती लोकसंख्येत राबविणार? (अंमलबजावणीचे केंद्र)

प्रत्येक जिल्ह्यानुसार आणि महसुली गावानुसार आदिवासी लोकसंख्या वेगवेगळी आहे. आदिवासी वस्त्यांमध्ये गाव-पाडे येतात, ज्यांची संख्या आणि व्याप्ती विभागवार बदलते. स्थूलमानाने एक प्रकल्प कार्यक्षेत्रामध्ये १५ ते २० हजार लोकसंख्या येते, जी २०-२५ गावांमध्ये विखुरलेली आहे. ८००-१००० लोकसंख्या असलेले महसुली गाव यासाठी निवडण्यात आले आहे. एक स्त्री स्वयंसेवक आणि एक पुरुष

स्वयंसेवक हे या गावातील लोकांमध्ये काम करतील.

३. कार्यक्रम

गावांची निवड ही ए.आ.वि.प्र. च्या प्रकल्प अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार केली जाईल. प्रत्येक कार्यक्षेत्राकरिता गाव/पाडा आणि त्याची वितरण व्यवस्था, दुर्गमता व पायाभूत सुविधा यानुसार वेगळे नियोजन केले जाईल.

कार्यक्षेत्र निवडताना ग्रामपंचायत महसुली गाव आणि पाडा यांच्यामध्ये व भौगोलीक क्षेत्रामध्ये सुसूत्रता राहील याची काळजी घेतली जाईल. महसुली गावाअंतर्गत अनेक पाडे येतात व अनेक ग्रामपंचायती येऊ शकतात तसेच ग्रामपंचायती अंतर्गत अनेक महसुली गावे येऊ शकतात.

परिशिष्ट ४

ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड आणि महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यांचा आदिवासींच्या सर्वांगीण आणि शाश्वत मानव विकासासंबंधी पाच वर्षांचा आदिवासी उत्थान कार्यक्रम.

घटक	कार्यक्रम
१. आरोग्य	
१.१ माता व प्रजनन आरोग्य	गरोदर व स्तनदा मातांचे आरोग्य ● नवजात बालके, शिशु व बालकांची काळजी. शाळापूर्व वयोगटातील बालकांची काळजी - आहार, लसीकरण व साध्या आजारांवरील उपचार ● किशोरवयीन मुलामुलींसाठी आरोग्य शिक्षण ● पाणी व सांडपाण्याची व्यवस्था ● वैयक्तिक स्वच्छता
१.२ रोग नियंत्रण	● सोपी व लक्षणांवर आधारित प्राथमिक उपचार. ● कुष्ठरोग, क्षयरोग, हिवताप, हगवण व कॉलरा सारख्या सार्वत्रिक संसर्गजन्य रोगांवर ताबाठेवण्यासाठीचा कार्यक्रम. ● अंधत्व प्रतिबंधासाठी - आहार, मोतीबिंदू, डोळ्यांचा कर्करोग, डोळ्यांची काळजी यासाठी योजना.
१.३ आहार व भरण पोषण	● परसबाग ● औषधी वनस्पती लागवड ● आहार शिक्षण - गरोदर, स्तनदा माता, शिशु व बालकांसाठी
१.४ औषधी वनस्पती	● स्थानिक उपलब्ध औषधी व पोषक भाज्यांचा आहारात जास्तीत जास्त वापर करणे. पारंपारिक आरोग्य सेवा देणाऱ्यांच्या मदतीने स्थानिक औषधोपचार पद्धतींचे जतन व संवर्धन करणे.

१. शिक्षण	
माहिती ज्ञान	• अंगणवाडी व प्राथमिक शिक्षणाचे सबलीकरण • आश्रम शाळांच्या दर्जात सुधारणा, तसेच मुले व मुलींसाठी आश्रमशाळा जिथे त्यांना आहार, वैयक्तिक स्वच्छता, लैंगिक शिक्षण, परसबाग, पर्यावरण व स्वच्छता, याविषयी शास्त्रीय माहिती व मार्गदर्शन मिळेल. • शाळांमधून व्यवसायाभिमूख शिक्षण देणे. वेगवेगळ्या प्रकारचे औद्योगिक प्रशिक्षण घेण्यास चालना देणे, संगणकाचा उपयोग. • आरोग्य व आहारासंबंधी असणाऱ्या गैरसमजुती व अंधश्रद्धा यांचे निर्मुलन करण्यासाठी समाजात जागृती निर्माण करणे.
३. उपजीविका, मिळकत वृद्धी आणि रोजगार निर्मिती	• सुधारीत शेतीकाम, औषधी वनस्पती लागवड, फलोत्पादन. • शेती कामगार व इतर सर्व कामगारांसाठी योजना, स्त्री कामगारांकडे विशेष लक्ष. • पशूधन विकास - किरकोळ वन उत्पादने गोळा करणे व त्यावर प्रक्रिया, उदा. फळे, औषधी वनस्पती. कुक्कट पालन, शेळी पालन तसेच इतर पशुपक्षी पालन. • अंबर चरखा, मध उत्पादनासारख्या खादी ग्रामोद्योग योजना. • रोजगार हमी योजना पाणलोट विकास, रस्ते व इतर स्थानिक बांधकामे, रोपवाटिका, परसबाग.
४. समुदाय विकास	• महिला मंडळ व स्वयंसहायता बचतगट निर्माण करणे. • युवक मंडळे व शेतकरी मंडळे संघटित करणे.
५. सक्षमीकरण/ सबलीकरण	• पंचायतराज संस्था: ग्रामसभेचे सबलीकरण, ग्रामपंचायत सदस्यांना खास करुन महिला सदस्यांना ग्रामपंचायत कामकाजाबाबत प्रशिक्षण. त्याचबरोबर एकात्मिक आदिवासी विकास योजना व इतर आदिवासींसाठीच्या योजना कशाप्रकारे राबविल्या जातात याची माहिती.
६. विकास कामातील कार्यकर्त्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन	• एकात्मिक बाल विकास प्रकल्पातील कार्यकर्ते, अंगणवाडी व आश्रमशाळा शिक्षक, वन विभागातील कर्मचारी, पंयाचती राजचे सर्व सदस्य, दाई, भगत, वैदू या सर्वांना आरोग्य व विकास याबद्दलची माहिती, व विकास घडवून आणण्यासाठी निरनिराळ्या कौशल्याबाबत प्रशिक्षण देणे.

७. आत्मसन्मान व सांस्कृतिक अस्मिता	• लोककला, संगीत, साहित्य यांना प्रोत्साहन देणे. वैज्ञानिक, शास्त्रीय दृष्टिकोन तसेच नैतिक मुल्यांच्या संवर्धानासाठी, या माध्यमांचा उपयोग करुन घेणे. • स्थानिक कलापथके संघटित करणे. • स्थानिक इतिहासाची, जपणूक व प्रसार करणे. • पारंपरिक ज्ञानाचा सन्मान व वापर करणे.

गावपाडा पातळीवर परिवर्तनाचा कार्यक्रम कोण करेल ?

स्वयंसेवक : एक पुरुष आणि स्त्री स्वयंसेवक प्रत्येक गावामधून निवडून विकासाच्या कार्यक्रमात विशेषत्वाने स्त्री–स्वयंसेवकाना माता व बाल संगोपनात प्रशिक्षित केले जाईल. पुरुष स्वयंसेवकाचा प्रमुख सहभाग हा आरोग्य, शिक्षण, उदरनिर्वाह आणि इतर विकास कृतिमध्ये ए. आ. वि. प्र. आदिवासी उपयोजना यामध्ये समन्वय ग्रामपंचायत पातळीवर ठेवणे हा राहील.

हे स्वयंसेवक स्वत: उत्स्फुर्त पणे लोक आणि स्वयंसेवी संस्था यांच्या मध्ये कृतिकार्यक्रमात दुवा म्हणून काम करतील.

३.१ सर्वांगीण विकासाची पाच वर्षात उद्दिष्टये गाठण्यासाठी सुचविलेल्या कृती व त्यासाठीचे निकष–

उद्दीष्ट १ : आदिवासी समाजाच्या आरोग्य व आहार पोषण दर्जात सुधारणा करणे	
कृती कार्यक्रम	**प्रक्रिया निर्देशांक**
• विकास कार्यकर्त्यांना प्रशिक्षण • गरोदर व स्तनदा मातांची काळजी • सुरक्षित बाळंतपण • आरोग्यवर्धक बालसंगोपणाच्या पद्धती • पाच वर्षांखालील बालकांच्या संगोपनावर लक्ष • प्रजनन व बाल आरोग्य • स्वच्छता व सांडपाण्याची व्यवस्था • जल शुद्धीकरण • संसर्गजन्य आजारांना प्रतिबंध व आळा • पोषक आहार कृती • परसबाग • किशोरवयीन मुलामुलींसाठी कुटुंब शिक्षण प्रशिक्षण	• आयोजित केलेल्या प्रशिक्षण सत्रांची संख्या • प्रसुती पूर्व व प्रसूतीनंतरच्या तपासणीसाठी १००% लाभार्थींची नोंद होणे. • ९०% बाळंतपणे आरोग्यसेविका/प्रशिक्षित दाईंकडून होणे. • माता मृत्युदर व आजार यांचे प्रमाण कमी होणे. • ९०% बालकांचे लसीकरण • बाल मृत्यू ५०% नी कमी करणे. • कुपोषणाच्या घटना ६०% कमी करणे • जुलाबाच्या घटनांचे प्रमाण ८०% ने कमी करणे. • श्वसनाच्या आजारांचे प्रमाण ५०% ने कमी करणे. • गावातच उपचारांनी बरे झालेल्या रुग्णांची संख्या

• प्रजनन व बाल आरोग्याबाबत सर्वसाधारण जागृती • गावातील आरोग्य कार्यकर्त्यांसाठी औषधोपचार पेटी • घरगुती औषधोपचार पद्धतींचे सबलीकरण • भगत व वैदू यांचा सहभाग	• प्रशिक्षणानंतर घरगुती औषधोपचार करणाऱ्या कुटुंबांची संख्या • प्रशिक्षित भगत व वैदूंची संख्या वाढविणे • साथीच्या रोगांमध्ये घट
उद्दीष्ट २ : शिक्षण	
• अधिकाधिक कार्यतत्पर होण्याच्या दृष्टीने अंगणवाडींचे सबलीकरण • प्राथमिक शिक्षणाचे सबळीकरण • वाचनालये/माहिती केंद्र गाव-संकुलात उभारणे. • गावकऱ्यांना माहितीपत्रकाचे वाचन करणे • अंधश्रद्धाबाबत समाजास जागृत करणे. • आदिवासी युवकांसाठी व्यक्तीमत्त्व विकास प्रशिक्षण • स्त्रिया व तरुणांसाठी व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण	• अगंणवाडी शिक्षणातील घटक, अभ्यासक्रमाचा दर्जा • अंगणवाडीत मुले किती वेळ असतात. • एकात्मिक बाल विकास प्रकल्पांमार्फत ९०% मुलांच्या वाढीचा पाठपुरावा व मूल्यमापन. • ९०% शाळा भरती व उपस्थिती • शाळा गळतीचे प्रमाण कमी करणे • शाळांच्या निकालांमध्ये ३०% सुधारणा होणे. • एका केंद्रात कमीत कमी दोन वाचनालये व माहिती केंद्रे सुरु करणे. • वाचनालये व माहिती केंद्राचा वापर करणाऱ्या गावकऱ्यांची संख्या • दर महिन्याला आखले गेलेले वाचन तास • व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षणाचा फायदा झालेले लाभार्थी
उद्दीष्ट ३ : उपजीविका आणि आर्थिक विकास	
• शेती व फलोत्पादन सुधारणेसाठी उपाय • उत्पन्न देणाऱ्या कृती योजना • भाजीपाला लागवड • आळंबी लागवड (मशरुम) • खाण्यास योग्य अशा कंदमुळांची लागवड उदा. टॅपिओका • अखाद्य तेलबियांची लागवड-यंत्रांसाठी / जनरेटर्ससाठी इंधन म्हणून वापरता येतील	• वाढलेले उत्पादन • सहभागी कुटुंबांची संख्या • अन्न पुरवठ्याची शाश्वती वाढविणे. • यातून मिळालेले अतिरिक्त उत्पन्न • घरात अन्नावर होणाऱ्या खर्चातील बदल • स्थलांतराचे प्रमाण कमी होणे • मुख्य किंवा जोड व्यवसाय करणाऱ्या लाभार्थींची संख्या

• औषधी वनस्पतींची लागवड • बांबू लागवड • इंधनाासाठी झाडांची लागवड • शेळी /बकरी पालन • मधमाश्या पालन • मत्स्यपालन • पशूधन विकास • दूध उत्पादन	

टीप : कार्यक्रमाच्या सुरुवातीची परिस्थिती जाणून घेण्यासाठी पायाभूत सर्व्हेक्षण केले जाईल. स्वयंसेवकांच्या प्राथमिक प्रशिक्षणानंतर कृति कार्यक्रम सुरु होतील. दोन वर्ष पूर्ण झाल्यानंतर मध्यावर्ती मुल्यमापन व प्रकल्पाच्या शेवटी एकदा प्रकल्पाचा परिणाम जाणून घेण्याकरीता मुल्यमापन केले जाईल. पायाभूत सर्व्हेक्षण आणि मुल्यमापनातील शोधकाच्या/ निकालाचा उपयोग कार्यक्रमाचा परिणाम मोजण्यासाठी होईल.

३.२ कार्यक्रमाची संरचना

मध्यवर्ती समन्वय पथक

सर्व कृति कार्यक्रमांचा समन्वय मध्यवर्ती कार्यालयाद्वारे होईल. यामध्ये खालीलप्रमाणे कर्मचारी पदावर असतील.

राज्य प्रकल्प समन्वयक : संपूर्ण प्रकल्पाचे संनियंत्रण व पर्यवेक्षण करतील सर्व नऊ कार्यक्षेत्रांत समन्वय ठेवतील. राज्य प्रकल्प समन्वयक पी. एच. डी. (समाज शास्त्र) आणि कमीत कमी ८-१० वर्षाचा आदिवासी क्षेत्राचा अनुभव असणारे असतील.

सहाय्यक राज्य प्रकल्प समन्वयक – दोन सहाय्यक राज्य प्रकल्प समन्वयक हे राज्य समन्वयकांना संपूर्ण महाराष्ट्रातील कामात मदत करतील. त्यांच्याकडे काही विशिष्ट भौगोलीक क्षेत्रांचा अधिभार दिला जाईल. हे समाज शास्त्र विषयात पदयुत्तर पदवी प्राप्त, आरोग्य शास्त्र कृषी, वैद्यकिय चइइड / इअचड आणि चार वर्षाचा आदिवासी क्षेत्रातील अनुभव असावा. एक सहाय्यक समन्वयक आरोग्य सेवेत पदवीप्राप्त असावा.

लेखापाल – लेखापाल हे सर्व क्षेत्रातील आर्थिक व्यवहारांशी निगडीत प्रकरणावर देखरेख करतील. लेखापाल पदाकरीता वाणीज्य शाखेतील पदवीधर कमीत कमी ८-१० वर्ष अनुभवी पाहिजे.

कार्यालय सहायक – कार्यालयीन सहायक कार्यालयातील कर्मचाऱ्यांना प्रकल्पाची दैनंदिन कामे करण्यास मदत करेल. तो कार्यालयाची देखभाल करेल. कार्यालयीन सहाय्यकासाठी किमान १२ वी पास पात्रता व ५-७ वर्षाचा अनुभव अपेक्षित आहे.

वाहन चालक – वाहन चालक पदासाठी योग्य शिक्षण व अनुभवाद्वारे दोन वाहन चालकांची नेमणूक होईल.

(ब) कार्यक्षेत्र पथक

कार्यालय – एक आदिवासी तालुका कार्यक्षेत्रात १५,००० ते २०,००० लोकसंख्येत काम

करण्यासाठी समन्वय पथक असेल. त्यामध्ये पुढीलप्रमाणे कर्मचारी असतील.

तालुका प्रकल्प समन्वयक – तो / ती संपूर्ण तालुक्याच्या कामासाठी जबाबदार असेल. तालुका प्रकल्प समन्वयक हा मध्यवर्ती कार्यालय आणि कार्यक्षेत्रात मुख्य दुवा असेल. कार्यक्षेत्रामधील सर्व कृति कार्यक्रमात समन्वय घडवून आणेल. तालुका प्रकल्प समन्वयक हा स्थानिक किंवा त्याच जिल्ह्यातील असून त्याला स्थानिक बोलीभाषा व भौगोलिक क्षेत्राचे ज्ञान असावे. तालुका प्रकल्प समन्वयक हा समाजशास्त्र, आरोग्यशास्त्र, कृषी किंवा आयुर्वेद शाखेतील पदवीधर असावा व त्याला आदिवासी भागात ४ वर्षेकामाचा अनुभव असावा.

तालुका प्रकल्प सहायक – ता. प्र. सहा. हा तालुका प्रकल्प समन्वयककला कार्यक्षेत्रातील कृतिकार्यक्रमात मदत करेल. प्र. सहा हा कोणत्याही शाखेचा पदवीधारक असावा व त्याला आदिवासी भागात काम करण्याच्या २-४ वर्षेअनुभव असावा.

तालुका कार्यक्षेत्र कार्यालयात दोघांपैकी एक तालुका प्रकल्प समन्वयक किंवा तालुका प्रकल्प सहाय्यक हा आरोग्य क्षेत्रातील असावा.

३.४ कार्यक्रमातील टप्पे

(अ) पूर्वतयारीचा काळ

(ब) प्रशिक्षण व मार्गदर्शन काल

(क) प्रत्यक्ष काम करण्याचा कालावधी

अ) पूर्वतयारीचा काळ

प्रकल्प सुरु करण्यापूर्वी स्थानिक परिस्थितीचे मूल्यमापन करण्यासाठी काही माहिती घेण्याची गरज असते. ज्या कार्यक्षेत्र भेटी, गाव पाड्यांचे निश्चितीकरण, पायाभूत सर्व्हेक्षण करणे, सर्व्हेक्षित माहितीचे पृथक्करण आणि अहवाल तयार करणे. सर्व्हेक्षणाची मदत ही पुढील नियोजन व मूल्यमापनासाठी होते.

पूर्वतयारीच्या कालावधीत करावयाच्या कृतिकार्यक्रमांचा तपशिल पुढीलप्रमाणे.

मध्यवर्ती कार्यालयातील कर्मचाऱ्यांची निवड – राज्य प्रकल्प समन्वयक आणि दोन सहाय्यक राज्य प्रकल्प समन्वयक निवड केली जाईल. तिघे मिळवून सर्व नऊ तालुक्यातील कृतिकार्यक्रमात समन्वय ठेवतील. राज्य प्रकल्प समन्वयक हे संपूर्ण टीमचे प्रमुख असतील आणि महाराष्ट्र शासनाच्या, आदिवासी विकास विभागाच्या पदाधिकाऱ्यांशी समन्वय ठेवतील.

कार्यक्षेत्रास भेटी – सुरुवातीला, ग्रामीण आरोग्य प्रकल्प व महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेतील संशोधकांची टीम यादीमध्ये दिलेल्या सर्व गाव-पाड्यांना भेटी देईल. संशोधकांची टीम अति दुर्गम भागातील गावासहीत सर्व गावांना भेटी देईल. स्थानिक परिस्थितीचे शीघ्र मूल्यांकन केले जाईल. त्या ठिकाणची परिस्थितीचा नोंदवली जाईल. याआधारे ज्या गावामध्ये कृति कार्यक्रम करणे शक्य असेल त्या गावांची यादी केली जाईल.

बैठक व गावांची निवड – ए. आ. वि. प्र. अधिकारी, पंचायत समिती अधिकारी, जिल्हा परिषद अधिकारी, व स्थानिक निर्वाचीत नेत्यांबरोबर बैठक घेतली जाईल. कृति कार्यक्रमासाठी गावांची यादी ए. आ. वि. प्र. व इतर शासकिय अधिकारी आणि निर्वाचीत नेत्यांच्या सल्ल्याने तयार होईल.

कार्यक्षेत्र पातळीवरील कर्मचारी निवड – गावांची निवड झाल्यानंतर कार्यक्षेत्राकरिता कर्मचारी

वर्गाची निवड होईल. कर्मचारी वर्गामध्ये ता. प्र. स. व प्र. सहाय्यक बहुधा त्याच जिल्ह्यातून नियुक्त केले जातील. त्यांना स्थानिक आदिवासी बोली भाषेचे व भौगोलीक परिस्थितीचे चांगले ज्ञान असेल. कार्यक्षेत्रामध्ये कृति कार्यक्रम करतील व त्यांचे मुख्य काम कार्यक्षेत्र व मध्यवर्ती समन्वयक पथकाचा दुवा होऊन रहाणे हे असेल.

पायाभूत सर्व्हेक्षणाचे नियोजन – पायाभूत सर्व्हेक्षणातील घटक हे कार्यक्षेत्राच्या पथदर्शी भेटी नंतर ठरतील. संशोधनाकरिता सर्व्हेक्षण पत्रक, विकास करणाऱ्या व्यक्तिंची रुपरेखा, मुलाखतीचे नमुना पत्रक सर्व गोष्टी संशोधक टीम तयार करेल. अंतिम स्वरुप दिलेले नमुने छापून घेतले जातील. ही सामुग्री नऊ कार्यक्षेत्रात पायाभूत सर्व्हेक्षणासाठी वापरली जाईल.

पायाभूत सर्व्हेक्षण – संशोधक टीम निवडलेल्या तालुक्यांना भेट देईल. माहिती गोळा करण्यासाठी स्थानिक सुशिक्षित तरुण (क्षेत्र अन्वेषक) निवडले जातील. क्षेत्र अन्वयेषक हे समाज शास्त्राचे पदवीधर असून त्याच तालुक्यात रहाणारे व स्थानिक बोलीभाषा समजणारे आणि भौगोलिक परिस्थिती जाणणारे असतील. अन्वेषकांना सर्व्हेक्षण तंत्र शिकवण्यासाठी दोन दिवसांची कार्यशाळा घेतली जाईल. कार्यशाळा ही तालुक्याच्या ठिकाणी घेतली जाईल. प्रशिक्षणानंतर गावांचे सर्व्हेक्षण हाती घेतले जाईल.

नमुना गावे ही कार्यक्रमाकरीता निवडलेल्या गावामधून घेतली जातील. या गावांमध्ये गावबैठका घेऊन सर्व्हेक्षणाचा हेतू स्पष्ट केला जाईल. संशोधकांच्या टीमकडून सर्व्हेक्षणावरती नियमीतपणे लक्ष ठेवले जाईल. एका कार्यक्षेत्राचे सर्व्हेक्षण होण्यासाठी सर्व साधारण पणे १५-२० दिवसांचा कालावधी अपेक्षीत आहे.

या पध्दतीनुसार सर्व नऊ कार्यक्षेत्रातील पायाभूत सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण होईल. आधारभूत माहिती एकत्रीकरण व विश्लेषण करण्याचे काम आधारभूत माहिती गोळा झाल्यानंतर लगेच हाती घेतले जाईल.

माहितीचे विश्लेषण – नऊ कार्यक्षेत्रांतून एकत्र केलेली संख्यात्मक आणि गुणात्मक माहितीचे मध्यवर्ती कार्यालयाकडून विश्लेषण केले जाईल. संख्यात्मक आधारसामुग्री संगणकामध्ये प्रवेशीत करून डझडड सारख्या विश्लेषक कार्यक्रमाच्या सहाय्याने विश्लेषण केले जाईल. गुणात्मक माहितीसाठी आशयनिष्ठ विश्लेषण पध्दत वापरली जाईल.

पायाभूत सर्व्हेक्षणाची फलनिष्पत्ती ही सर्वांगीण अहवालाच्या स्वरुपात असेल. अहवालामध्ये गुणात्मक व संख्यात्मक माहिती प्रस्तावामध्ये दिलेल्या घटकांवर असेल. माहितीचे विश्लेषण दोन स्तरावर करण्यात येईल. तालुका निहाय व समाज निहाय.

अपेक्षेनुसार पायाभूत सर्व्हेक्षणाच्या संपूर्ण कामाला सहा महिने इतका कालावधी लागेल.

गावातील स्वयंसेवक निवड – प्रत्येक कार्यक्षेत्रातून जवळपास ५५ स्वयंसेवक कार्यक्रमाचे गावात काम करण्यासाठी निवडले जातील. ५०% स्वयंसेवक स्त्रिया असतील. ८०० लोकसंख्या असलेल्या गावात एक पुरुष व एक स्त्री स्वयंसेवक निवडण्यात येईल. स्वयंसेवकांमधून पाच चुणचुणीत आणि हुशार व ज्यांच्यामधे नेतृत्व गुण आहेत अशांची मार्गदर्शक म्हणून निवड होईल. यापैकी दोन स्त्रिया असतील. मार्गदर्शक हे स्थानिक पातळी व तालुका कर्मचारी वर्गामध्ये समन्वय ठेवतील. एक मार्गदर्शक

साधारणत: दहा स्वयंसेवकांबरोबर समन्वय ठेवेल. राज्यातील संपूर्ण नऊ कार्यक्षेत्रात ४५० स्वयंसेवक व ४५ मार्गदर्शक असतील.

मार्गदर्शक आणि स्वयंसेवकाना आरोग्य आणी विकास विषयक कार्यक्रमाचे प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षणानंतर स्वयंसेवक व मार्गदर्शक आपापल्या गावपाड्यात कामास सुरुवात करतील. ते समाजातील लोकांना विकासाचे कार्यक्रम अंगिकारण्यास प्रवृत्त करतील.

(ब) प्रशिक्षण आणि मार्गदर्शन कालावधी

१) **तालुका स्तरीय कर्मचारी प्रशिक्षण –** सर्व नऊ कार्यक्षेत्रातील कर्मचाऱ्यांना एक आठवड्याचे प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षणाचे आयोजन पायाभूत सर्व्हेक्षणा पूर्वी करण्यात येईल. ग्रामीण आरोग्य प्रकल्प आणि महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद येथील तज्ञ व्यक्ति मार्गदर्शन करतील.

२) **स्वयंसेवक प्रशिक्षण –** तालुक्याच्या ठिकाणी स्वयंसेवक प्रशिक्षण घेतले जाईल. त्यांना निवासी प्रशिक्षण दिले जाईल. याखेरीज विविध विषयातील ज्ञानवर्धन करणे आणि माहिती देण्याकरता प्रासंगिक प्रशिक्षण सत्र आयोजित केली जातील. प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून अभ्यास सहली काढल्या जातील. त्याठिकाणी होणारे कार्यक्रम हे प्रशिक्षण प्रक्रियेचा भाग असतील.

(अ) **निवासी प्रशिक्षण –** प्रकल्पाच्या पहिल्या वर्षात स्वयंसेवकांसाठी दहा दिवसाचे निवासी प्रशिक्षण घेतले जाईल. प्रशिक्षण कार्यक्रमात ५ दिवसांचे एक याप्रमाणे दोन सत्र असतील. या सत्रांद्वारे स्वयंसेवकाना आरोग्याच्या विविध पैलूंचे प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षण सहभागी तत्वर आधारीत व स्थानिक आरोग्य समस्याना प्राथमिकता देऊन असेल. याद्वारे गावामध्ये सुलभतेने काम करता येतील. दुसऱ्या वर्षापासून निवासी प्रशिक्षण वर्षातून ५ दिवस असेल. विषयातील तज्ञ स्वयंसेवकाना मार्गदर्शन करतील. ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड यांचा पाठ्यक्रम वापरला जाईल. ग्रामीण आरोग्य प्रकल्पामधील अनुभवी प्रशिक्षक हे प्रशिक्षण देतील.

(ब) **प्रात्यक्षिक व अभ्यास दौरा –** प्रकल्पाच्या सुरुवातीला ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड, भंडारदरा, 'सर्च' गडचिरोली किंवा इतर स्वयंसेवी संस्थांच्या कार्यक्षेत्रात अभ्यास दौरे घेतले जातील. याने स्वयंसेवकांच्या मनात विकास घटकांच्या विषयी कुतुहल निर्माण होऊन ते या कार्यक्रमांना अंगीकरण्यास पुढाकार घेतलील.

(क) **प्रशिक्षण वर्ग –** स्वयंसेवकांकडून माहिती घेणे व त्यांना विकासाच्या विविध मुद्द्यांवर प्रशिक्षित करण्यांच्या हेतुने प्रति महिना दोन दिवस प्रशिक्षण घेतले जाईल. प्रत्येक स्वयंसेवकाला एक वर्षात २४ दिवसांचे प्रशिक्षण मिळेल. तालुका प्रकल्प समन्वयक प्रशिक्षण वर्गाचे आयोजण स्थानिक पातळीवरील विविध विषयात प्रवीण असणाऱ्या साधन व्यक्ति प्रशिक्षणा करीता निमंत्रीत केल्या जातील.

(ड) **प्रशिक्षण साहित्य –** प्रत्येक स्वयंसेवकाला विकास, आरोग्य व पोषण, शिक्षण, उदारनिर्वाह, उत्पन्न वाढीचे कार्यक्रम इ. वर आधारीत प्रशिक्षण साहित्य पुरवले जाईल. समाजातील विविध लक्ष गटांकरीता प्रशिक्षण साहित्य पुरवले जाईल.

(इ) **इतर स्थानिक साधन व्यक्ति प्रशिक्षण –** प्रकल्प शाश्वत होण्याकरीता स्थानिक व्यक्तिंना प्रशिक्षण देणे व समावून घेणे गरजेचे असते. दाई, वैदू, सरपंच, उपसरपंच इतर ग्रामपंचायत सदस्य (विशेषत: महिला सदस्य), पोलीस पाटील, अंगणवाडी कर्मचारी, प्राथमिक शाळा शिक्षक, महिला मंडळ अध्यक्ष, तरुण मंडळ आणि इतर स्थानिक कार्यकर्तेज्यांचा विकास प्रक्रियेत सहभाग आहे, या सर्व व्यक्तिंना स्वयंसेवकांबरोबर प्रशिक्षण दिले जाईल. प्रति वर्षी स्थानिक व्यक्तिंकरीता ५ दिवस प्रशिक्षण आयोजित केले जाईल. अपेक्षेनुसार एका कार्यक्षेत्रातून साधारणत: २०० कार्यकर्तेप्रशिक्षीत केले जातील. स्वयंसेवक ह्या सर्वांबरोबर समन्वयाने काम करतील.

(क) प्रत्यक्ष कृति कार्यक्रम करण्याचा कालावधी

पायाभूत सर्व्हेक्षणाचे विश्लेषणातून स्थानिक आरोग्य, शिक्षण आणि विकासात येणाऱ्या समस्या समजण्यास मदत होईल. पायाभूत सर्व्हेक्षणातील फलीताधारे समाजाच्या सम्मतीने कार्यक्रम करता येतील. कार्यक्रम पध्दतीने हाती घेतला जातील. दरवर्षी नवीन कृति कार्यक्रम हाती घेतले जातील. स्त्रिया, गरीब आणि भूमिहीन कुटुंबांना या कृति कार्यक्रमात प्राधान्य दिले जाईल.

स्वयंसेवक त्यांच्या गावात काम सुरु करतील व बदलाचे सदस्य म्हणून काम करतील.

(अ) **उदरनिर्वाह व उत्पन्न वाढीचे कार्यक्रम –** आर्थिक उत्पन्नाचा स्तर वाढवणे, स्थलांतर रोखणे व अन्नाची हमी निर्माण करणे हे याचे उद्देश असतील.

(ब) **आरोग्य कार्यक्रम –** कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रत्येक स्वयंसेवकाला सामान्य आजारांवर उपचार करण्यासाठी औषध पेटी देण्यात येईल. याचा उपयोग विश्वास संपादन करण्यासाठी होईल. परंतु या कार्यक्रमाचा मुख्य केंद्र बिंदू बालमृत्यू कमी करणे, बाल आजार कमी करणे व पोषण सुधारण्याच्या करीता होईल.

स्त्रियांचे आरोग्य व किशोरी आरोग्य हे विषय हाताळले जातील. स्थानिक आरोग्य परंपराना बळकटी देण्याचे कार्यक्रम हाती घेतले जातील. आदिवासीना सर्वसाधारण आजारांसाठी पारंपारिक व घरगुती उपचार घेण्यास प्रोत्साहन देण्यात येईल.

(क) **शैक्षणिक कृति –** शाळेत हजेरी वाढवणे, गळती कमी करणे. विशेषत: मुलींची निकालात सुधारणा करण्याचे प्रयत्न केले जातील.

(ड) **सामाजिक विकास –** सामाजिक विकास कार्यक्रमात स्वयंसहायता बचत गट स्थास्पना, महिला मंडळ, तरुण मंडळ, शेतकरी मंडळ स्थापन करणे व त्याद्वारे कृती करुन सामाजिक सबलीकरण याने प्रकल्पातून होणारे बदल शाश्वत होतील.

(ई) **सांस्कृतिक कार्यक्रम –** कार्यक्रमाचा भाग म्हणून विविध सांस्कृतिक कार्यक्रम स्थानिक परंपरा सबलीकरणासाठी केले जातील. या कार्यक्रमातून सामाजिक प्रश्न, आरोग्य आणि शिक्षण यासंदर्भात विविध संदेश दिले जातील. आदिवासींचे पारंपरिक ज्ञान संकलित केले जाईल.

सामाजिक सहभाग – समाजघटकांना सर्व कार्यक्रमात सहभागी करुन घेण्याची काळजी घेतली जाईल. सामाजिक सहभागातूनच सर्व कृति कार्यक्रमांचे

नियोजन केले जाईल. समाजाकडून श्रमदानाद्वारे सहभाग अपेक्षित आहे.

पंचायत राज संस्थांचा सहभाग – गाव पातळीवर ग्रामपंचायत आणि त्याच्या विभागाना सहभागी करुन घेतले जाईल. तालुका पातळीवर कार्यक्रमाचे नियोजन आणि संनियंत्रण पंचायत समिती द्वारे होईल. पंचायती राजच्या सहभागाने कार्यक्रम शाश्वत होण्यास मदत होतील.

दस्तैवजीकरण आणि मूल्यमापन

दस्तैवजीकरण : प्रकल्पाच्या सुरुवातीपासूनच सर्व प्रकल्याचे दस्तैवजीकरण केले जाईल. पुणे कार्यालय आणि तालुका कार्यालय कर्मचाऱ्यांकडून प्रशिक्षण आणि विकास कृतिकार्यक्रमांचे दस्तैवजीकरण होईल. दस्तैवजीकरणाच्या सुविधेसाठी आराखडे तयार केले जातील. राज्य प्रकल्प समन्वयक सर्व दस्तैवजीकरणाचे सांनियंत्रण करतील. दस्तैवजीकरणाचा डेटा (वरींर) संनियंत्रण व मुख्य मापनासाठी उपयोगी पडेल.

मूल्यमापन – मध्यवर्ती मूल्यमापन तीन वर्षाच्या शेवटी व अंतिम मूल्यमापन कार्यक्रमाच्या शेवटी कार्यक्रमाचा प्रभाव बघण्यासाठी केले जाईल. पायाभूत सर्व्हेक्षणाचे विश्लेषण फलित आणि मूल्यमापनाचे फलीत यांच्या तुलनेतून कार्यक्रमाने पडलेला फरक मोजता येईल. आधारसामग्री विश्लेषणाद्वारे सुध्दा मुल्यमापनास मदत होईल.

४. कार्यक्रम नियंत्रक समिती

मूल्यमापन कृतिकार्यक्रमांचे संनियंत्रण तीन पातळ्यांवर होईल. क्षेत्रपातळी, राज्य पातळी व मंत्रालय पातळी. संबंधीत समित्यांद्वारे कायर्क्रमाचे अवलोकन करुन कार्यक्रम सुरळीत चालण्यासाठी सूचना दिल्या जातील.

(अ) क्षेत्रिय घटक नियंत्रण समिती

अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग	अध्यक्ष
ए. आ. वि. प्र. अधिकारी	उपाध्यक्ष
गट विकास अधिकारी	सदस्य
स्थानिक आदिवासी आमदार/लोकप्रतिनिधी	सदस्य
पंचायत समिती – सभापती	सदस्य
राज्य प्रकल्प समन्वयक किंवा सहाय्यक राज्य प्रकल्प समन्वयक	सदस्य
स्वयंसेवक प्रतिनिधी (स्त्री–स्वयंसेविका)	सदस्य
तालुका प्रकल्प समन्वयक	सचिव

क्षेत्रिय घटक नियंत्रण समिती बैठक तिमाही आयोजित केली जाईल.

सभापती पुरुष असेल व उपसभापती स्त्री असल्यास तिला पण सदस्यत्व द्यावे.

(ब) राज्यस्तरीय समन्वय समिती

मा. आयुक्त, आदिवासी विकास विभाग	अध्यक्ष
अप्पर आयुक्त आदिवासी विकास विभाग	उपाध्यक्ष
प्रकल्प अधिकारी (संबंधीत)	सदस्य
राज्य प्रकल्प समन्वयक	सचिव
सहा. राज्य प्रकल्प समन्वयक	सदस्य
अध्यक्ष - ग्रामीणआरोग्य प्रकल्प	सदस्य
अध्यक्ष - म. मा. वि. प.	सदस्य

राज्य स्तरीय समन्वय समिती बैठक चारमाही घेण्यात येईल. किमान एक वर्षात तीन बैठका होतील.

(क) उच्चस्तरीय समन्वय समिती

मा. सचिव, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन	अध्यक्ष
मा. आयुक्त, आदिवासी विकास विभाग	सदस्य
आध्यक्ष, ग्रामीण आरोग्य प्रकल्प	सदस्य
आध्यक्ष, म. मा. वि. प.	सदस्य
राज्य प्रकल्प समन्वयक	सचिव

उच्चस्तरीय समन्वय समिती बैठक सहामाही होईल.

५. कार्यक्रमाचे फलीत

आदिवासींचा आरोग्य व पोषण विषयक दर्जा उंचावेलं. याचे प्रतिक म्हणजे कुपोषण, बालमृत्यु व आजारांचे प्रमाण कमी होईल. शिक्षणाची अवस्था सुधारुन शाळेतील उपस्थिती वाढेल व गळती आणि शाळा सोडण्याचे प्रमाण कमी होऊन निकालाचा दर्जा उंचावेल. उदरनिर्वाह व उत्पन्न वाढीचा कार्यक्रमाद्वारे आदिवासी नागरीकांची आर्थिक उन्नत्ती होऊन ते स्वायत्त होतील.

आदिवासी खेड्यांमध्ये कार्यक्रम संपत्यानंतर सुद्धा उच्यप्रशिक्षित व कुशल मनुष्यबळाद्वारे विकास कार्यक्रम सुरु राहून कार्यक्रम शाखत होईल. प्रकल्पाच्या शेवटी पुढील प्रमाणे कुशल मनुष्यबळ प्रकल्प क्षेत्रात असेल.

आदिवासी ग्राम स्वयंसेवक -	४५०
आदिवासी ग्राम मार्गदर्शक -	४५
स्थानिक साधन व्यक्ति -	२८००

या व्यक्तिद्वारे सुमारे दोन लक्ष लोकसंख्येला सेवा मिळत राहील.

(पृष्ठ क्र. ४६ वर पहा)

तात्त्विक बैठक व दृष्टिकोन

प्रा. रा. के. मुटाटकर

लोकांच्या समस्या त्यांच्या नजरेतून समजून, त्यांच्या सहभागातून एकात्मिक विकास साधण्याची महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची वैचारिक बैठक आहे.

आपला कार्यक्रम हा आदिवासी लोकांचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास करण्याचा आहे. त्याचे अंतिम ध्येय आत्मविश्वास, आत्मसन्मान व अस्मिता असले तरी हे ध्येय गाठण्यासाठी आदिवासींच्या दैनंदिन गरजांची पूर्ती होणे आवश्यक आहे. शासनाने आपल्या कार्यक्रमाचा केंद्रबिंदू आरोग्य मानला आहे; परंतु आरोग्य आणि विकास, संस्कृती आणि समाज यांचा अलगपणे विचार होऊ शकत नाही. सर्वसाधारणत: जागतिक पातळीवर आरोग्य आणि शिक्षण हे विकासाचे गणक मानले आहे. आपण आपल्या कार्यक्रमात आश्रमशाळा आणि अंगणवाडी ह्या संस्था विकासाचे माध्यम म्हणून केंद्रीभूत मानले आहे.

आपल्याला **आदिवासी जनतेचा विकास** करायचा आहे, प्रदेशाचा नाही. त्यासाठी आपला संबंध थेट जनतेशी असावयास हवा. तसे करण्याचे माध्यम म्हणून आपण जनतेचे प्रतिनिधी म्हणून स्वयंसेवकांची निवड केली आहे. त्याच्या वरची फळी त्यांच्यातीलच मार्गदर्शक, सहाय्यक समन्वयक (शक्य झाल्यास आदिवासी आणि निर्णायकपणे त्याच भागातील) आणि त्यापुढे तालुका समन्वयक अशी आहे. शासकीय कार्य प्रणालीप्रमाणे आपण केवळ स्वयंसेवकांपर्यंत पोहोचतो, जनतेपर्यंत पोहोचत नाही, म्हणून गाव पाड्यावर रात्रीच्या मुक्कामाचा विचार झाला. काही कार्यक्रम न करता किंवा चर्चेच्या बैठकी न घेता केवळ गावपाड्यावर जेवावयास जाणे व झोपण्यास जाणे हे अपेक्षित नाही. वाहन सोय असल्याने उशीरा रात्री परत यावयास हरकत नाही; परंतु रात्री झोपल्यास सकाळचे कार्यक्रम आदिवासींबरोबर उरकल्यास जास्त जवळीक निर्माण होते. आपल्या राहण्याचा भार स्वयंसेवकांवर नको, आपली व्यवस्था करण्यास स्वयंसेवकांने मदत करावयाची आहे . आपल्याकरिता वेगळा स्वयंपाक होणे, कोंबडीचे कालवण होणे आणि त्याची चर्चा त्यांच्या कुटुंबात होणे हे गैर आहे.

आपण स्वयंसेवी संस्थेचे कार्यकर्ते आहोत. महाराष्ट्रात स्वयंसेवी संस्थांना ज्योतीबा फुले, आगरकर, रानडे, टिळक, विठ्ठल रामजी शिंदे आणि जगाला मार्गदर्शन देणारे भारतीय महात्मा गांधी यांचा वारसा आहे. अजूनही जनार्दन महाराजांसारखे समाजसेवक आपल्यात आहेत, याची आपण आठवण ठेवावी. आपल्यापैकी काही लोकांना लबाडीमुळे, भ्रष्टाचारामुळे आणि नशेच्या आहारी जाऊन आपल्या कार्यक्रमाची आणि संस्थांची बदनामी होण्याइतपत वर्तन केल्याने, त्यांना जावे लागले. आपण आदिवासी लोकांना भारताचे नागरिक म्हणून, समतेच्या भावनेतून, मानाने त्यांना स्थान मिळवून देण्याच्या प्रयत्नात आहोत. ही विचारसरणी ज्यांना भावत नसेल त्यांना आपण सांभाळू शकत नाही.

जगाची, देशाची, आदिवासी समाजाची जर प्रगती आणि विकास व्हायचा असेल तर आदिवासींच्या अंतर्गत वेगवेगळ्या समाजामधील असमानता दूर व्हावयास हवी, या भावनेने शासनाने पी.टी.जी. हे वेगळे मानले आहेत. ते इतरांपेक्षा का व किती मागासलेले आहेत हे आपणास

सर्वेक्षणातून काढावयाचे आहे, तसेच वेगवेगळ्या समाजातील विकासांच्या टप्प्यांवर काय फरक आहे हेही ओळखायचे आहे. काही समाजातीलच मुले आश्रमशाळेत का जातात, काही समाजातील मुलांचे वजन कमी-जास्त का असते, हे ओळखून त्याबाबतची उपाययोजना करावयाची आहे. आपल्या क्षेत्रात आपल्या कार्यक्रमातील घटकांच्या बाबतीत विचारपूर्वक नवीन कार्यक्रम मांडून आणि शासनाच्या कार्यक्रमाची कार्यक्षम अंमलबजावणी करुन त्याचा अनुभव शासनास, देशास आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर दाखवून दिल्यास सर्वांगीण व शाश्वत विकासाचे निराळे प्रतिमान विकसित होईल. शासनाने केवळ बायफ व आपली निवड याकारणांकरिता केलेली आहे आणि त्यानुसार आपल्याकडून त्यांच्या अपेक्षा आहेत.

या सर्व कारणांकरिता आपण वेगवगेळ्या पातळ्यांवर सर्वेक्षण करणार आहोत. एकजिनसी समाज असल्याने प्रत्येक प्रकारची माहिती कौटुंबिक पातळीवर घेणे आवश्यक नाही; परंतु योजना तयार करण्यासाठी आणि त्याचे मूल्यमापन करण्यासाठी सांख्यिकी माहितीची गरज असते. काही माहिती गुणात्मक पद्धतीने गाव-पाडा पातळीवर त्या त्या समाजाच्या पातळीवर आणि समाजातील घटक स्त्री-पुरुष, युवक, भगत, शिक्षक, शासकीय कर्मचारी इ. च्या मार्फत करता येईल. सर्वेक्षण जसे आपल्यास महत्त्वाचे आहे तसेच ते स्वयंसेवक व जनतेच्या पातळीवरही महत्त्वाचे आहे. स्वयंसेवक अनपढ़ (अशिक्षित) असले तरी सर्वेक्षणाची जबाबदारी त्यांच्यावरच टाकायची आहे, ते आपले माध्यम आहेत. स्वयंसेवक आणि इतर लोकप्रतिनिधी तसेच युवक, महिला इ.चे आपण सक्षमीकरण-सबलीकरण करावयाचे आहे. स्वयंसेवक कार्यक्षम नसल्यास त्यांच्याशी संवाद साधून आणि जनतेशी संवाद साधून पर्यायी व्यवस्था करता येईल; परंतु डॉ. आरोळे यांनी सांगितल्याप्रमाणे जसे आपण सरपंचास काढू शकत नाही तसे स्वयंसेवकासही काढू शकत नाही.

सर्वेक्षणाच्या प्रक्रियेत काही लोक स्थलांतरित झाले असल्यास त्यांच्या कुटुंबाची शक्य तेवढी माहिती गावपातळीवर भरावी व तशी नोंद करावी. परंतु कुटुंब केवळ स्थलांतरीत झाले आहे म्हणून इतर उपलब्ध माहिती संकलित न करणे योग्य होणार नाही. स्थलांतरीत कुटुंबाची माहिती तेथील आपला स्वयंसेवक अथवा इतर शेजारी सुद्धा सांगू शकतील.

सारांश रुपाने आदिवासी उत्थान कार्यक्रमाचा मूळ गाभा हा लोकांचा विकास आहे आणि त्यासाठी कार्यक्रम आणि कार्यक्रमातील घटक यांची मांडणी केलेली आहे. ही बाब प्रत्येक सभेत आणि प्रत्येक प्रशिक्षण शिबिरात प्रत्येक वेळी थोडक्यात मांडली पाहिजे म्हणजे ती जनमानसात रुजेल. शासन व्यवस्थेत ज्याप्रमाणे वेगवेगळ्या विभागांमार्फत स्वतंत्रपणे कारभार चालतो आणि त्यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे कार्यक्रम चांगले असूनही त्यांची फलनिष्पत्ती होत नाही, तसे आपल्याकडे घडू नये यासाठी आपल्या घटकातील उद्दिष्ट, त्याच्या पूर्तीसाठी कार्यक्रम, त्यासाठी वेगवेगळ्या कृती आणि त्यातील टप्पे याबाबत तक्ता रूपाने नीट आखणी करावी. तसेच त्याकरिता काळ मर्यादा आणि अपेक्षित बजेट याचाही उल्लेख करावा. सर्व आर्थिक व्यवहार विश्वासार्ह पारदर्शी राहिले तर आपले सर्वांचे संबंधही चांगले राहू शकतात.

कार्यक्रमाचा आत्मा : आपला जनतेबरोबर जास्तीत जास्त थेट संवाद व्हावयास हवा.

• • •

आदिवासी लोकांसाठी काम करताना

Comprehensive & Sustanable Human Developmant of Maharashtra

या प्रकल्पाचे मराठीतून नामकरण **आदिवासी उत्थान कार्यक्रम** असे केले आहे.

उत्थान : लोकांनी स्वबळावर, आत्म सन्मानाने, विश्वासाने स्वत:चे प्रश्न सोडविण्यासाठी स्वत:च्या पायावर उभे राहण्याची क्षमता विकसीत करणे.

जेव्हा सर्वांगीण व श्वाश्वत असे म्हणतो त्यावेळी त्याचा वापर आदिवासीसाठी आपणास करावयाचा आहे कोणत्याही प्रदेशाचा विकास करायचा आहे असे नाही. कार्यक्रमात आपण पायाभूत सोई सवलतीचा विकास करायचा आहे असे आपण म्हणत नाही. आता पुण्यासदंर्भात म्हणायचे झाले तर, पुण्याचा विकास करायचा आहे. उदहरणादाखल पुण्यातील रस्ते सुधरावण्याचे, बस व्यवस्था सुरळीत करायची म्हणजेच पायाभूत सुविधा विकसीत करायच्या असे म्हटले जाते. परंतु पुण्यातील लोकांचा विकास करायचा आहे असे कुणी म्हणत नाही. आपल्या प्रकल्पाबाबत म्हणायचे झाले तर आपणास आदिवासी लोकांचा विकास करायचा आहे.

मानव विकास म्हणजे विकासाची वेगवेगळ्या संधी आहेत त्या उपलब्ध असणे आणि आपल्या मर्जीने त्याचा वापर करुन घेणे. आदिवासी संदर्भात म्हणायचे झाले तर आदिवासींना पोटाची खळगी भरण्याचाच जिथे प्रश्न आहे, तिथे विकासांचा प्रश्नच येत नाही. आत्म सन्मानाने, आत्मविश्वासाने व अस्मितेची जपणुक करुन स्वत:ला भावेल, स्वत:ला आवडेल असा जर विकास केला तर मग त्याला मानवी विकास म्हणता येईल. अशी क्षमता त्यांच्या मध्ये विकसीत होईल या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

पंडित जवाहरलाल नेहरुंच्यानुसार Development accordng to ther own Genius म्हणजेच आदिवासीना जे भावले त्यादृष्टीने त्यांचा विकास करणे असा अर्थ होतो. म्हणजेच अनेक संधी उपलब्ध करुन देणे व त्यातील काही संधी निवडून त्यांनी त्यांचा स्वत:चा विकास करणे असे अपेक्षित आहे.

घटनेमध्ये Backward class असा शब्द वापरला आहे. या शब्दाला अनुसुचित जाती व अनुसूचित जमाती असं संबोधलं गेलं. मागास कुणाला म्हणायचे? मागासवर्गीय म्हणजे काय? अमेरीकन म्हणतात, भारतीय लोक मागास आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील लोकांना वाटत विदर्भ, मराठवाड्यातील लोक मागास आहेत, म्हणजे आपण मागास आहे असा शब्द सहजासहजी वापरतो. पण त्याचा नक्की अर्थ काय ? आम्ही जो काही अर्थ केलेला आहे तो पुस्तकांमध्ये आलेला नाही. विकासाच्या सोयी सवलती, संधी उपलब्ध असताना सुद्धा त्या संधीचा उपयोग करुन घेण्याची क्षमता नसणे म्हणजे मागासलेपणा होय.

आपण असे म्हणतो की आदिवासी विभागात आय. टी. आय. सुरु करा. त्याप्रमाणे आय. टी. आय. सुरु केला की त्यात एकही आदिवासी मुलगा

नसतो. शिक्षक/अधिकारी काय म्हणणार ? मुलं आलीच नाही. शाळा उघडली, आश्रमशाळा उघडली त्यात कातकऱ्याचं एकाही पोर सापडत नाही. दवाखाने उघडले, आदिवासी आमच्याकडे येत नाहीत ते वैदूकडे जातात. हे सर्व बोलणारे लोक आदिवासींना मागासलेले ठरवतात. असंही म्हणतात की, आम्ही सर्व सोई सवलती उपलब्ध करुन दिल्या परंतु ते त्याचा फायदा करुन घेत नाही म्हणून तुम्ही मागासलेले. आदिवासींना कळत नाही असं नाही. त्यांना कळतं की आश्रमशाळेत शिकायला मिळते, दवाखान्यात डॉक्टर असतो व औषधेही असतात, परंतू ते घेण्याची क्षमता त्यांच्यामध्ये नाही. आदिवासींना ह्या गोष्टींचा काहीच फायदा होत नाही. माळी काम, स्वयंपाकी, सफाई कामगार, सुरक्षा रक्षक म्हणून ते फार फार तर काम करु शकतील. आदिवासी उत्थान कार्यक्रमामध्ये आदिवासीची क्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत. भारतातील इतर नागरीकांच्या बरोबरीने ज्या काही भारतातील विकासाच्या संधी उपलब्ध होतात, त्या संधीचा फायदा घेण्याची क्षमता त्यांच्या मध्ये कशा प्रकारे विकसीत करायची हा कळीचा मुद्दा आहे.

कातकऱ्यांच्या मुलांना शाळेत प्रवेश दिला परंतु ते निघून गेले आम्ही काय करायचे? ते दवाखान्यात आले होते परंतु सल्ला देऊनही त्यांनी तो ऐकला नाही व ते निघून गेले. आम्ही काय करणार? असं डॉक्टर म्हणणार. आपण त्याला उत्तर असं देतो की, हा प्रश्न आहे उत्तर नव्हे. या प्रश्नाचं उत्तर काय आहे ? उत्तर असं आहे की, आदिवासींमध्ये संधीचा फायदा घेण्याची क्षमता वाढवणं. कातकऱ्यांच्या मुलांनी पूर्णपणे शिक्षण घेण्यासंबंधीची मानसिकता तयार करणे याविषयी प्रयत्न करणे गरजेचे आहे, हे आपले काम आहे.

जीवनमान गुणात्मकरित्या उंचावण्यासाठी जरी पायाभूत व्यवस्था करण्यात आली तरी त्याचा उपयोग घेण्याची क्षमता नसणे म्हणजे मागासलेपण. अशी व्याख्या नंदूरबार रिपोर्ट मध्ये प्रा. रा. के. मुटाटकरांनी केलेली आहे. भारत सरकारच्या आदिवासी विकास धोरणात ‘ स्वत:ची अस्मिता मिटवून मुख्य प्रवाहात सामील होण्याचे धोरण नसून, स्वत:ची अस्मिता व संस्कृती टिकवून मुख्य प्रवाहात परिपूर्ण प्रगल्भ करण्याचे धोरण आहे. ‘

१९३८ साली सिमिंग्टनने असे लिहिले आहे की, संपूर्ण देशात विकासाची आणि प्रशासनाची जी धोरणे अवलबंण्यात आली, तीच अदिवासी विभागासाठी लागू करणे हे प्रमेय अगदी चुकीचे आहे. हे इथे मुद्दाम नोंदविले आहे.

संस्कृती ही एकात्मिक असते. संस्कृतीचे सामाजिक, सास्कृंतीक व राजकीय पैलू असतात ते एकमेकांशी निगडीत असतात. यामध्ये विविध अंगांचा समावेश असतो. पैकी त्यातील कुठल्याही अंगात बदल करायचा म्हटला की तो बदल सर्व अंगाना स्पर्श केल्याशिवाय होत नाही. कुटुंब नियोजन यशस्वी करायचे असेल तर प्रथमत: मुलीचे शिक्षण व्हायला हवे. तसेच मुलींच्या लग्नाचे वय कसे वाढेल, याकडे प्रकर्षाने पहायला हवे. लग्नाचे वय शासनाने जी. आर. काढून वाढणार नसते, तर त्यासाठी कार्यक्रम व्हायला पाहिजेत ते कार्यक्रम आपण कसोशीने घेतले नाही तर ध्येय यशस्वी होणे अवघड आहे.

देशव्यापी प्रमुख समाजास लागू होणारी विकासाची धोरणे आणि अंमलबजावणी, आदिवासी विकासास लागू होऊ शकत नाही. ऐतिहासिक आणि भौगोलिक परिस्थितीमुळे आदिवासी संस्कृती भिन्न

आहे. जास्त एकात्मिक आहे. संस्कृतीच्या कुठल्याही एका अंगात परिवर्तनाचा प्रयत्न केल्यास त्याचा परिणाम संस्कृतीच्या इतर अंगावर होतो. आदिवासी संस्कृती ही जास्त एकात्मिक असल्याने तिच्यात सहजासहजी परिवर्तन घडून येत नाही. इतर समाजात विभागवार परिवर्तनाच्या प्रक्रियांप्रमाणे आदिवासी समाजात त्या परिणामकारक ठरत नाहीत. त्याकरिता संस्कृतीच्या सर्व अंगांना स्पर्श करतील अशा सर्वांगीण योजनांची गरज असते. याकरिता आदिवासी उत्थान कार्यक्रमात सहा घटकांवर आधारीत कृतिकार्यक्रम घेतले आहेत.

२.२ कार्यक्रमाचे घटक

१) आरोग्य

अ) **प्रजनन व बाल आरोग्य :** गर्भवती स्त्रिया व स्तनदा मातांची काळजी, सुरक्षीत बाळंतपण, नवजात बाळाची काळजी व लहान मुलांची काळजी, भरण पोषण, लसीकरण, किरकोळ आजारांवर उपचार. किशोर वयीन मुलामुलींचे आरोग्य शिक्षण, पाणी व स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता.

ब) **आजार नियंत्रण :** सर्वसामान्य साथीच्या आजारांवर नियंत्रण, डोळ्याची निगा, मोतीबिंदू आंधळेपणा यासारख्या आजारांवर नियंत्रण.

क) **पोषण व आहार :** परसबाग, वनौषधी लागवड, र्गभवती व स्तनदा माता, लहान मुले यांच्यासाठी पोषण व आहार विषयक प्रशिक्षण, स्थानिक, पारंपरिक पोषण आहाराला प्रोत्साहन आजारावर उपचारांसाठी पारंपरिक वनौषधीच्या वापरासाठी भगत व वैदूंना प्रोत्साहन.

२) शिक्षण

अंगणवाडी व आश्रम शाळांचे सक्षमीकरण

आश्रमशाळांना माहिती व विकास केंद्र बनवण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन, परसबाग, परिसर स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता, आदिवासी विकास योजनांसाठी माहिती केंद्र यासारखे उपक्रम.

आरोग्य व आहाराबाबत असलेल्या अंधश्रध्दा गैरसमज याबाबत जनजागृती.

३) उदरनिर्वाह व उत्पन्नवाढीबाबत कार्यक्रम

शेती फलोत्पादन, औषधी वनस्पती यात उत्पन्न वाढीसाठी सुधारीत पध्दतींचा अवलंब.

पशुधन विकास, कुक्कुट पालन, शेळीपालन, वराहपालन व इतर प्राणीपक्षी पालनासाठी प्रोत्साहन.

गौणवनोपज गोळा करुन त्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रोत्साहन, रोपवाटिका, मधुमाशि पालन, खादी ग्रामोद्योग महामंडळाच्या योजनांची अंमलबजावनी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून पाणलोट क्षेत्र विकास, जोड रस्ते, स्थानिक कामे.

४) समुदाय विकास व सबलीकरण

स्वयंसहाय्यता बचत गट, सार्वजनिक वाचनालय, वाचक मंडळाची स्थापना, महिला मंडख, शेतकरी मंडख, युवकमंडख, किशोरी मंडळांची स्थापना.

ग्रामपंचायत सदस्य विशेषत: महिला सदस्यांमध्ये अधिकारांविषयी जागृती, ग्रामसभांचे सबलीकरण, लोहसहभागातून ग्रामविकास आदिवासी उपयोजना, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तसेच इतर शासकीय विकास योजनांची माहिती लोकांना करून देणे.

५) प्रशिक्षण व मार्गदर्शन

एकात्मिक बाल विकास यंत्रणा, आश्रम शाळा शिक्षक, वनयंत्रणा, पंचायतराज सदस्य व यंत्रणा, दाई, वैदू, भगत व गावपातळीवरील इतर महत्त्वाच्या घटकांना आरोग्य व विकास विषयक प्रशिक्षण व मार्गदर्शन.

६) सांस्कृतिक वारसा व अस्मिता

लोककला, लोकसंगीत, साहित्य, पारंपरिक ज्ञान वगैरे गोष्टींचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी प्रयत्न.

स्थानिक कलापथकांचे संघटन, वैज्ञानिक दृष्टीकोन व नैतिक मूल्ये जपण्यासाठी लोककलांचा वापर. स्थानिक इतिहासाच्या वारशाची जपणूक.

२.३ विश्वास संपादन करणारे कृतिकार्यक्रम

आदिवासी लोक कठीण भौगोलिक परिस्थितीत राहिल्याने आरोग्यवर्धन आणि रोगमुक्तिसाठी आरोग्य सेवांबाबत त्यांनी स्थानिक पातळीवर मिळते जुळते धोरण अवलंबिले होते. आदिवासी जनतेला रोगमुक्ती आणि आरोग्य वर्धनाच्या व्यवस्थापनाचा अनुभव आल्यास आदिवासींचा शासकीय आरोग्य व्यवस्थेवर विश्वास बसेल.

आदिवासी जनतेचा विश्वास संपादन करण्याकरिता सुरुवातीला विश्वास संपादन करणारे कृतिकार्यक्रम हाती घेतले गेले. यामध्ये प्रामुख्याने औषध पेटी गावातील स्वयंसेवकांकडे ठेवण्यात आली. ह्या पेटी मध्ये सामान्य सांसर्गिक आजारांना गाव पातळीवर अटकाव करणारी औषधे होती. गरीबी, सरकारी दवाखान्यापर्यंत जाण्यासाठी लागणारा वेळी ह्यामुळे उदा. पॅरासिटामॉल, सेप्ट्रान, फ्युराझोलीडीन व इतर आजार अंगावर काढणाऱ्या लोकांना ह्या औषध पेटीचा उपयोग झाला. गाव पातळीवरच उपचार होत असल्याने स्वयंसेवकांचा गावात आदर होऊ लागला ह्या सगळ्याचा उपयोग पुढील क्षमता विकासाच्या कार्यक्रमांकरिता झाला.

क्षमता विकास/सक्षमीकरण करणारे कृति कार्यक्रम

गाव पातळीवर लोकांशी जवळचा संबंध येणारे व गावचे आरोग्य कार्यकर्तेम्हणून काम करणारे स्वयंसेवक हे गाव पातळीवर आरोग्य सुधारण्याकरिता काम करतात. आरोग्य म्हणजे काय ? आरोग्य चांगले राखण्यासाठी आहार, पोषण, लसीकरण यांचा सहभाग कशा प्रकारे आहे ? हे सर्व माहिती करून देण्याकरिता स्वयंसेवकांना दरमहा प्रशिक्षण दिले जाते. त्यांच्या कामातल्या अडचणी जाणून घेतल्या जातात. ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेडच्या प्रशिक्षित स्वयंसेविका द्वारा स्वयंसेवकांचे तीन ते पाच दिवसांचे निवासी प्रशिक्षण घेतले गेले. गावातील पारंपरिक दायांना देखील अशाप्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले.

याबरोबरच अंगणवाडी सेविकांच्या समन्वय बैठका, पंचायतराज प्रशिक्षण, आरती संस्थेचे प्रशिक्षण, पपेट शो द्वारा जनजागृतीचे प्रशिक्षण देण्यात आले. आदिवासी भागात वैदू मोठ्या संख्येने आहेत. केवैदू वनस्पती व त्यांचा रस देऊन उपचार करतात. त्यांचे वनस्पती विषयीचे ज्ञान चांगले असते. माणूस उपचारासाठी आल्यावर जंगलातून वनस्पती आणून उपचार केले जातात. ह्याच वनस्पतींवर प्रक्रिया करून त्यापासून औषधे तयार करून ठेवल्यास त्यांचा वापर तातडीने करता येतो. या करिता वैदूंना औषध प्रक्रिया करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

आदिवासी समाजाला आरोग्य आणि विकासाबाबत माहिती व प्रशिक्षण देणारे कृति कार्यक्रम घेण्यात आले.

२.४ कुपोषणाशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निगडीत कार्यक्रम

आरोग्य, शिक्षण इत्यादी सहा घटकातील कार्यक्रम राबविताना बालमृत्यू व कुपोषणाशी प्रत्यक्ष निगडीत कार्यक्रम सर्वच कार्यक्षेत्रात ठळकपणे राबविले गेले. या कार्यक्रमांमध्ये प्रामुख्याने सकस आहार, गरोदर मातांना एकवेळ पोटभर चौरस जेवण, झबली टोपडी, औषध पेट्या, किशोर वयीन आरोग्य शिक्षण, खेळवाडी, आदर्श अंगणवाडी असे कार्यक्रम राबविण्यात आले.

या खरेदी समाज विकासासाठी पंचायत राज प्रशिक्षण, बचत गट प्रशिक्षण, पपेट शो, आरती संस्थेतील प्रशिक्षणासारखे बालमृत्यू व कुपोषणाशी अप्रत्यक्ष निगडीत कार्यक्रम घेण्यात आले.

बालमृत्यू-कुपोषणाशी थेट संबंध असणारे उपक्रम

आरोग्य	शिक्षण
१) सकस खाऊ व मुलांची वजने २) गरोदर मातांना एकवेळ पोटभर चौरस आहार (जेवण) देणे. ३) झबली व जन्मनोंद ४) श्रेणी ३ व ४ मधील मुलांना विशेष आहार व औषधोपचार ५) अंगणवाडी समन्वय व अंगणवाडीचा आहार लाभार्थींना मिळवून देणे. ६) औषधपेट्या (आयुर्वेदीक व ॲलोपॅथी) ७) पाणी शुद्धीकरण (पाडा व घर) ८) आरोग्य शिबीर व तपासणी (माता, बालक व किशोरवयीन मुली) ९) दाईहट व दाईकीट १०) परसबाग व पोषण आहार शिक्षण ११) शोषखड्डे, परिसर व वैयक्तीक स्वच्छता	**अंगणवाडी सबलीकरण** १) खेळवाडी-आहार व शिक्षण (आय.सी.डी.एस.चे साह्य घेणे.) २) अंगणवाडीत -पुस्तके, खेळणीसंच पुरविणे, किरकोळ दुरुस्ती, परसबाग इत्यादी उपक्रम ३) शाळाबाह्य किशोरवयीन मुलींचे आरोग्य शिक्षण **आश्रमशाळा सबलीकरण** १) आश्रम शाळा पाणीपुरवठा २) मुलींची आश्रम शाळा. -स्वच्छता व स्नानगृह हे उपक्रम राबविणे. ३) किशोरवयीन मुलींचे आरोग्य शिक्षण ४) आश्रम शाळा परसबाग, नर्सरी (प्रकल्प कार्यालयाच्या साह्याने) ५) पी. टी. जी. विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी करणे. ६) आश्रमशाळेतील १० वीच्या निकालात प्रगतीसाठी उपक्रम. ७) संगणक प्रशिक्षण व आश्रमशाळांचा माहिती केंद्र म्हणून उपयोग करणे ८) आश्रमशाळांना औषधपेटी देणे (ॲलोपॅथी, आयुर्वेद) ९) ग्रंथालय व प्रयोगशाळा सबलीकरण व्यवसायाभिमुख प्रशिक्षण

• • •

गावसभेसाठी मार्गदर्शक टिपण

(समन्वयकाने गाव-पाड्यातील बैठकीत कार्यक्रमाविषयी बोलताना कसे बोलावे, काय माहिती द्यावी याचे हे टिपण दिले आहे.)

डॉ. पु. सु. आगाशे

मंडळी नमस्कार!

आपण आता कार्यक्रमाला सुरुवात करु. तुम्हाला असा प्रश्न पडला असेल की ही मंडळी कोण? कुठून आली? कशासाठी आली? गावात काय काम काढले?

तर सर्वप्रथम आमची ओळख करुन देतो. माझं नाव -----------------------------मी -----------इथं राहतो. आहेत माझे सहकारी -------------------, हे -----------गावाचे. आम्ही आहोत आदिवासी उत्थान कार्यक्रमाचे कार्यकर्ते.

महाराष्ट्र शासनाचा आदिवासी विकास विभाग आहे. त्याचं मुख्य कार्यालय नाशिक येथे आहे. त्यातील एक संस्था आहे - ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड. या संस्थेचे प्रमुख आहेत डॉ. रजनीकांत आरोळे, आणि दुसरी संस्था आहे-महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, या संस्थेचे अध्यक्ष आहेत प्रा. रा. के. मुटाटकर.

आपल्याला माहीतच आहे की स्वातंत्र्य मिळून ५७ वर्षे झाली तरी देखील आदिवासी हा मागासलेलाच राहिला आहे. शासनाच्या निरनिराळया प्रकारच्या योजना तसेच संस्थांनी केलेल्या कामामुळे काही प्रमाणात बदल झाला. पूर्वी ज्या भागात पायावाटा होत्या तिथं कच्चे रस्ते झाले, काहीकाही ठिकाणी डांबरी रस्ते झाले. पूर्वीच्या काळी इकडच्या भागात शिक्षणाची काहीच सोय नव्हती. आता गाव पाडयावर चौथीपर्यंत तरी शाळा झाली. काहीकाही ठिकाणी दवाखाने उघडले गेले; पूर्वी नदी नाल्याचं पाणी प्यावं लागायचं, आता विहिरी हातपंप वैगरेची सोय झाली. तर सांगायचं मुद्दा काय की आदिवासी भागात पण थोडयाफार प्रमाणात सुधारणा झाल्या. तरीपण आदिवासी इतर समाजासारखा सुधारला, असे म्हणता येणार नाही. अजूनही शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, रस्ते, रोजगार याबाबतीत खूप काही करायचे बाकी आहे. आपल्याला माहीतच आहे की शासन यंत्रणा गाव पाडयातल्या शेवटच्या माणसापर्यंत कधीच पोहोचू शकत नाही.

आदिवासींच्या विकासासाठी शासनाच्या अनेक योजना आहेत, मात्र त्याची माहिती गाव पाडयातल्या आदिवासीपर्यंत पोहोचतच नाही. माहिती नसते. त्यामुळे आपल्याला त्या योजनांचा लाभ मिळू शकत नाही.

आपल्याला माहीतच आहे, आपण वाचतो, ऐकतो, बघतो की आदिवासी भागात मोठया प्रमाणात कुपोषण, बालमुत्यू होत असतो. आदिवासींना खायला मिळत नाही. त्यांचे स्थलांतर होत असते वगैरे. शासनाला देखील या परिस्थितीची पूर्ण कल्पना आहे. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आदिवासी भागातून चांगला बदल घडवून आणण्यासाठीच राज्य शासनाने आदिवासी उत्थान कार्यक्रम, दोन स्वयंसेवी संस्थांना दिला आहे.

हा कार्यक्रम राज्यातील सात जिल्ह्यांतील नऊ अतिशय मागास अशा तालुक्यांतून सुरु झाला आहे. त्यामध्ये ठाणे जिल्हयातील जव्हार व मोखाडा हे दोन

तालुके आहेत; तिकडे नंदूरबार मधले अक्राणी, अक्कलकुवा, अमरावतीला धारणी, गडचिरोलीमधला एटापल्ली, यवतमाळमधला झरीजामणी, अहमदनगरमधला अकोले, आणि रायगड जिल्हयातला कर्जत असे तालुके आहेत. या कार्यक्रमात शासनाने कातकरी, कोलाम आणि माडिया या तीन अति मागास अशा आदिवासी समाजांचा समावेश खास करुन केला आहे.

आपल्या ------------------- जिल्हयातील -------------- तालुक्यामधून एकूण --------------- ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये ----------------- या ग्रामपंचायतीचा समावेश होतो. या ग्रामपंचायतीचा अंतर्गत सर्व गावे व पाडयातून हा कार्यक्रम पाच वर्षे चालवण्यात येणार आहे. त्यामध्ये आपले हे ----------------- गाव (किंवा पाडा) आलेच.

आता थोडीशी आमच्या ज्या दोन संस्था आहेत त्यांच्याबद्दल माहिती देतो.

ग्रामीण आरोग्य प्रकल्प ही नगर जिल्हयातील जामखेड तालुक्यातील संस्था. या संस्थेचे प्रमुख आहेत डॉ. रजनीकांत आरोळे. आरोळे सरांनी १९७० साली जामखेड तालुक्यात काम करायला सुरुवात केली. त्यावेळी तालुका पण असाच मागासलेला होता. लहान मुलांमध्ये कुपोषण होतं, बरीच मुलं पहिल्या एकदोन वर्षातच मरायची. गावामध्ये बाळंतपणात स्त्रिया अडायच्या, त्यावेळेस तिथे कुठला आता डॉक्टर? मग काही स्त्रिया गावातच मरायच्या तर काही स्त्रिया तुमच्यासारखंच झोळी करुन नेत असताना वाटते मरायच्या, त्यावेळेस तिथं वाहतुकीची कुठलीच साधनं म्हणजे जीप, बस, रिक्षा काहीच नव्हतं. लोकांची फारच गैरसांय व्हायची. साध्यासाध्या छोटया आजारांमुळे लोक आजारी पडायची, दवाखान्यात जायचं म्हटलं तर पैसे लागायचे आणि मजुरी पण बुडायची. मग लोक असंच कोणाकडं तरी भगत, देवऋषी यांच्याकडे जायचे. उपाय झाला झाला नाहीतर तसंच अंगावर काढायचे. त्या भागात गरीबी पण खूप. शेतीतून फारसं काही व्हायचं नाही. लोक उपाशीपोटी दिवस काढायचे नाहीतर जायचे तुमच्यासारखेच कुठेतरी मजूर म्हणून.

आरोळे सरांनी ही सर्व परिस्थिती बघितली. त्यांनी ठरवलं की लोकांना शिकवायचं. त्यांच्या पायावर उभं करायचं. त्याचा असा विश्वास होता की लोकांचं आरोग्य लोक स्वत:च सुधारु शकतात खरं तर फारच थोडया आजारासाठी डॉक्टरांची गरज असते. म्हणून त्यांनी काय केलं गावातल्या अडाणी, निरक्षर अशा महिला निवडल्या आणि त्यांना माहिती देऊन तयार केलं. मग या महिला गावातच काम करायला लागल्या. सुरुवातीला त्यांना गावातून बराच त्रास झाला. पण त्या महिला काम करतच राहिल्या. गावात कोणी आजारी असेल तर त्याला औषधपाणी करत जास्त झालं तर धोक्याच्या खुणा ओळखून दवाखान्यातच पाठवून देत, आजारांची माहिती लोकांना देत, औषधी वनस्पतीचा वापर अशी अनेक कामं त्यांनी केली.

त्याचबरोबर त्यांनी गावात सिस्टर/नर्सबाई काम करत नव्हती त्यांनी तिला जाब विचारला. अशाप्रकारे या महिलांनी गावात आरोग्याचे काम केलं त्यामुळं गावातल्या लहान मुलांचे कुपोषण थांबलं, बाळ-बाळं ऐतीण तसंच लहान मुलं मरेनाशी झाली. गावातल्या आजाराचं प्रमाण कमी झालं. या महिलांनी मग विकासाची कामं हाती घेऊन गावात बदल घडवून

आणला. त्यानंतर गावातीलच लोकं त्यांना मान द्यायला लागली, गावातल्या कोणत्याही कामासाठी त्यांना विचारायला लागली.

अशाप्रकारे या संस्थेचं काम विस्तारत गेलं. आज नगर, बीड, उस्मानाबाद या जिल्हयातल्या जवळजवळ ४०० गावांतून या संस्थेचं काम सुरू आहे. आरोळे सरांना त्यांच्या कामाबद्दल पद्मभूषण हा अत्यंत मानाचा समजला जाणारा पुरस्कार देऊन भारत सरकारने त्यांचा गैरव केला आहे. मॅगसेसे पुरस्कार हा परदेशातला पुरस्कार पण त्यांना मिळाला आहे.

आता दुसरी जी संस्था आहे – महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद त्याबद्दल थोडी माहिती देतो. संस्था पुणे विद्यापीठात प्रा. मुटाटकर सरांनी महाराष्ट्रातील १६ वी १७ वी ला शिकविणाऱ्या शिक्षकांच्या मदतीने १९७६ साली स्थापन केली. या संस्थेने महाराष्ट्रातील सर्व भागातील लोकांचा खास करून आदिवासी लोकांचा अगदी त्यांच्याबरोबर आठ पंधरा दिवस राहून अभ्यास केलेला आहे. त्यामुळं आदिवासी खातात काय, पितात काय, त्यांचे सणवार, उत्सव कोणते, त्यांची नाचगाणी कोणती, त्यांचे देव कोणते, आदिवासींना कोणकोणत्या अडचणी येतात वगैरे सर्व गोष्टींची माहिती त्यांना आहे. मग त्यात वारली, कातकरी आणि ठाकर, भिल्ल, पावरा, कोरकू, कोलाम, माडिया, गोंड, परधान आणि सर्व प्रकारचे आदिवासी आले. फक्त महाराष्ट्रातच नाही तर इतर राज्यातल्या आदिवासींचा पण अभयास केलेला आहे.

परिषदेने आदिवासी भागात ज्या महिला ग्रामपंचायत सदस्य पहिल्यांदाच निवडून आल्या होत्या त्यांच्यासाठी पंचायत राज्य या विषयावर प्रशिक्षण शिबिरे ठाणे, नाशिक, नंदूरबार जिल्हयातील तालुक्यांतून भरवली होती. याचा फायदा जवळजवळ ३०० महिलांना झाला.

संस्थेतर्फे ‘हाकारा’ त्रैमासिक काढण्यात येतं. हे मासिक आदिवासींच्या प्रश्नांना वाचा फोडणारं मराठीतील एकमेव (फक्त एकच) असं आहे. यामधून महाराष्ट्रातल्या आदिवासींचे अभ्यासक कार्यकर्तेयांनी जंगलजमीनीचे प्रश्न, आदिवासी शिक्षण, आरोग्याच्या समस्या अशा विषयांवर लिहिलेले आहे. या मासिकातून आपल्या आदिवासींच्या कविता, गाणी, गोष्टी नियमितपणे छापून येतात. या हाकारा मासिकामुळेच महाराष्ट्रातले आदिवासी लेखक, कवी पहिल्यांदाच एकत्र आले. त्यानंतर आता १०-१५ वर्षांपासून आदिवासी साहित्य संमेलनांना सुरुवात झाली.

आदिवासी भागातले काम करणारे कार्यकर्तेशासकीय अधिकारी, अभ्यास करणारे अशी लोकं अनेकवेळा प्रशिक्षण, चर्चासत्र वगैरे कार्यक्रमातून एकत्र आले आहेत.

तर अशा प्रकारे गेली २५-३० वर्ष काम करणाऱ्या दोन संस्थांचे प्रमुख आरोळे सर आणि मुटाटकर सर यांनी शासनाच्या वेगवेगळया आदिवासी विकास समित्यांवर काम केलेले आहे. त्या राज्याचे मंत्री, सचिव व आयुक्त यांच्याबरोबर नियमीत बैठका, चर्चा होत असतात.

या दोन संस्थांचं चालू असलेलं काम व स्वच्छ कारभार बघूनच शासनानं या कार्यक्रमाची जबाबदारी या दोन संस्थांवर सोपविली आहे. आणि हे काम शासनाच्या मदतीनंच पार पाडायचे आहे.

आता तुम्ही म्हणाल हा कार्यक्रम कोणता आणि आम्हाला त्यापासून काय लाभ मिळणार?

तर आम्ही तुम्हाला दत्तक घेणार नाही किंवा आयते खायला देणार नाही; पण शेती, धंदा इत्यादीचे सुधारीत तंत्र शिकवू. एकदा का ते तंत्र तुम्हाला कळलं की मग तुम्हाला आमची गरज राहणार नाही. तुम्ही तुमची कामे करुन तुमचा स्व:चा, समाजाचा विकास करु शकाल. त्यासाठी जी काही माहिती लागेल, मार्गदर्शन लागेल ते देण्याची व्यवस्था आम्ही करु. शासकीय अधिकाऱ्यांना इथं बोलावून शासनाच्या आदिवासींसाठी असलेल्या योजना काय आहेत, त्याची माहिती तुम्हाला मिळाली तर तुम्ही तुमच्या स्वत:च्या पायावर उभे राहू शकाल.

तुम्हा लोकांमध्ये मोठी ताकद असते. आता गावात काही लग्न असलं, यात्रा असली तर पाचशे - हजार माणसांना लागणारं जेवण कोण बनवतं? तुम्हीच ना? आमच्या सारख्या शहरातल्या लोकांना ते बाहेरुन बनवून आणावे लागते, आम्हाला नाही जमू शकत ते काम.

तुम्ही लोक पण हुशार असता. शेती कशी करावी, जंगलात काय काम मिळतं.. कोणत्या गोष्टी खाता येतात, जंगलातले प्राणी, पक्षी, झाडे याबद्दल तुम्हालाच जास्त माहिती असते, आम्हाला नाही. आम्ही आपले चार पुस्तके शिकलेले. आम्हाला जी माहिती मिळते ती पुस्तकातून आणि त्या ज्ञानावरच आम्ही हुशारी दाखवतो. आम्हाला लिहायला वाचायला सांगितले तर जमू शकेल;पण फाटी/लाकूड तोडायला सांगितले किंवा नांगर धरायला सांगितलं, शेतात काम करायला सांगितलं तर मात्र जमणार नाही. देवानं प्रत्येकालाच काहीतरी बुध्दी दिली आहे. असं काही नाही की आम्ही शहरातली लोकच फक्त हुशार आणि गावातले आदिवासी अडाणी तुमच्यातही चांगले गुण आहेत. त्या चांगल्या गुणांचा वापर करुन, ज्या गोष्टी माहीत नाहीत, त्यांची माहिती करुन घेत आपल्याला आपल्या समाजाचा विकास करुन घ्यायचा आहे.

आता आम्हाला थोडंसं तुमच्या गावाबद्दल / पाडयाबद्दल सांगा (पुढील प्रश्न विचारुन लोकांकडून माहिती घ्यावी)

१. गावामध्ये कोणी आजारी पडलं तर तुम्ही काय करता? कोणाकडे उपचाराला जाता? किती लांब? किती भाडं लागतं? कसे जाता?
२. रात्री अपरात्री एखाद्याला जास्त झालं तर तुम्ही काय करता?
३. पावसाळयात काय स्थिती असते?
४. तुमची मजुरी किती बुडते?
५. सरकारी दवाखान्यात जात असाल तर तिथे डॉक्टर असतो का?
६. उपचार होतात का?
७. खाजगी डॉक्टरकडे गेलं तर किती पैसे खर्च होतात?
८. बाळंतपण कोण करतं? गावात दाई/ सुईण आहे का?
९. गावात भगत/वैदू/भूमका/परिहार आहे का? त्याला घाडपाल्याची माहिती आहे का?
१०. गावात नर्सबाई/सिस्टर येते का? किती दिवसांनी येते?
११. लहान बाळांना लसीकरण करते का?
१२. गावामध्ये पाडयात किती कुपोषित मुलं आहेत?
१३. गावात कितवीपर्यंत शाळा आहे?
१४. गावातील मुलं आणि मुली कितवीपर्यंत शिकतात?
१५. दहावी पास होऊन पुढं शिकायला गेलेली मुलं किती?

१६. आणि दहावी नापास झालेली मुलं किती

१७. शिकून नोकरी/काम धंद्याला लागलेली मुलं किती?

१८. आश्रमशाळा कोठे आहे? अंगणवाडीत काय-काय मिळते?

१९. तुमच्या शेतामध्ये काय पिकते?

२०. एक पिक येतं का दोन पिकं येतात?

२१. पिकलेलं धान्य किती महिन्यापर्यंत पुरतं? पावसाळयापर्यंत/होळीपर्यंत?

२२. गावात किती लोकांकडे जमीन आहे?

२३. ज्यांच्याकडे जमीन आहे अशी लोकं काय करतात?

२४. गावातील किती लोक मजुरीसाठी बाहेर जातात? काय करतात? किती मजुरी मिळते?किती दिवस काम करतात?

आता जे काही प्रश्न आम्ही विचारले आणि जी काही चर्चा झाली त्यातून आम्हाला बरंच काही शिकायला मिळालं, माहिती झाली. आता आदिवासी उत्थान कार्यक्रमातून आम्ही काय करणार आहोत ते सांगतो.

आपल्याला आपलं गावचं जे काही चित्र आहे ते बदलायचं आहे. एक आदर्श गाव निर्माण करायचे आहे. त्यासाठी तुम्ही आता तुमच्या गाव/पाडयातून कार्यकर्ता निवडला आहे. या कार्यकर्त्याला आम्ही प्रशिक्षण देणार, माहिती देऊन तयार करणार. मग ते तुम्हाला गावात येऊन माहिती देतील. त्यांच्यामार्फतच आपल्याला गावाच्या विकासासाठीचे काम करायचे आहे आणि पाच वर्षात आपल्याला गावाचा कायापालट करायचा आहे.

आरोग्याच्या बाबतीत म्हणाल तर डॉक्टरकडे जाऊन किंवा औषध गोळया खाऊन वा इंजेक्शन, सलाईन घेऊन आजार काही बरे होत नाहीत. त्यासाठी इतरही प्रयत्न करावे लागतात. या निवडलेल्या कार्यकर्त्याला आम्ही आरोग्यविषयक प्रशिक्षण देणार. आजार कसे होतात ? त्यावर काय उपचार घ्यायचे ? हे आम्ही त्यांना शिकवणार. त्याच्याजवळ किरकोळ आजारांची औषधं देऊन ठेवणार. औषधी झाडपाल्याचे साधे सोपे उपयोग त्याने शिकवणार, त्याची माहिती ते तुम्हाला देतील. दाई, वैदू, भगत यांना आणखी माहिती देणार.

आपल्याला अशी काळजी घ्यायची आहे की एकतर गावामध्ये आजार होताच कामा नये. आणि समजा झालेच तर त्यावर गावातल्या गावातच उपचार झाले पाहिजेत. म्हणजे मग तुमचा वेळ आणि पैसा वाचू शकेल, मजुरी बुडणार नाही. तसंच आपल्याला गावातून एकही मूल कुपोषित राहणार नाही, कुठल्याही बालकाचा मृत्यू होणार नाही या दिशेने प्रयत्न करायचे, कोणती काळजी घ्यायची, काय खायचं प्यायचं हे आम्ही तुम्हाला माहित करुन देऊ. आहार व पोषणाच्या बाबतीत ज्या काही चांगल्या गोष्टी तुमच्या समाजात आहेत त्याला आपण बळकटी द्यायची आहे.

आपल्या गावामध्ये कोणी भगत, वैदू/ भूमका,परिहार असतो कोणी दाई असते. ही लोकं पूर्वीपासून गावामध्ये राहिलेली आहेत. त्यांना त्यांच्या क्षेत्रातील माहिती असते. अगदी डॉक्टर नसल्याच्या काळापासून दाई/सुईणीनींच गावातली बाळंतपण केली आहेत. औषध देऊन लोकांना बरे केले आहे. दवाखाने वगैरे म्हणजे अगदी अलीकडे म्हणजे ३०-४० वर्षापासून झाले आहेत. मात्र गावातील ही तज्ञ मंडळी गावाच्या आरोग्याकडे लक्ष पुरवित आली आहेत.

कित्येक ठिकाणी आम्हाला असं पाहायला मिळालं की, शहरातील माणसं डॉक्टरकडे जाऊन, त्याची फी देऊन थकतात, तरीपण त्याचा आजार बरा होऊशकत नाही. मग त्यांना कोणाकडून तरी कळतं, म्हणून ते आदिवासी भगत वैदूंकडे येतात. त्याच्याकडे उपचार घेतात आणि बरे होऊन जातात.

तर सांगायचा मुद्दा असा की या लोकांकडे पण पारंपरिक ज्ञान आहे, जे तुम्हाला आम्हाला खूपच उपयोगी ठरु शकते. आम्ही या सगळया लोकांना आमच्या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी करुन घेणार आहोत. आत्ताचं जे काही नवीन ज्ञान, माहिती आहे ती आम्ही त्यांना देणार आहोत. म्हणजे ते गावातल्या लोकांना अधिक चांगल्याप्रकारे सेवा देऊ शकतील.

आमचा विश्वास आहे की आमच्यासारखी बाहेरची लोकं येऊन लोकांचे आरोग्य सुधारु शकणार नाहीत. तुमचं आरोग्य तुमच्याच हातात आहे. आम्ही जे काही नवनवीन तंत्रज्ञान येत आहे त्याची माहिती गावातल्याच लोकांना देऊन त्यांना चांगलं तयार करणार; म्हणजे मग आम्ही जरी ५ वर्षांनी बाहेर पडलो तरी तुम्ही हे काम पुढे नेऊ शकाल.

स्वच्छतेच्या बाबतीत शोषखड्डा, सांडपाणी व कच-याची विल्हेवाट, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता यावर भर देऊन आपण आपण आपले आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने प्रयत्न करायचा आहे.

शिक्षणाची परिस्थिती बघितली तर आपल्याला खूप करता येण्यासारखे आहे. महाराष्ट्रातला सगळा आदिवासी भला बघितला तर असं दिसतं की, गळतीचे प्रमाण खूप आहे. कोणी चौथी नंतर गळतं तर कोणी सातवीनंतर त्यातल्या त्यात मुलींची गळती तर बरीच होते. जी मुलं पुढे जातात ती नववी दहावीलाच नापास होतात. नापास होण्याचे विषय कुठले तर इंग्रजी-गणित आणि मराठी, बरोबर आहे ना?

जे दहावी पास होतात, त्यांचे मार्क पण फारच कमी असतात. दहावीच्या पुढे फारच थोडी आदिवासी मुलं शिकतात. आपल्याला ही परिस्थिती बदलायची आहे. आज शासनानं उघडलेल्या आश्रमशाळांमुळे आपल्या मुलांची राहण्याखाण्यासकट शिक्षणाची सोय झाली आहे. आपण त्याचा पुरेपर वापर करुन घेतला पाहिजे. आपल्या आदिवासी मुलामुलींना दहावीपर्यंत तर शिकले पाहिजेच; पण त्याहीपुढे जाऊन इंजिनिअर, डॉक्टर, वकील तसेच कृषीपदवीधर बनले पाहिजे. शासनाच्या तसेच इतर संस्थांमध्ये मोठे अधिकारी बनले पाहिजे. तुम्ही आणि आम्ही मिळून आपल्या मुलांना चांगले शिक्षण कसे देता येईल? सगळेजण शाळेत कसे जाऊ शकतील? याबद्दल विचार करुन त्यावर अंमलबजावणी करायची आहे. गाव/पाडयातला एकही मुलगा किंवा मुलगी शिक्षणाशिवाय रहाणार नाही, असा निर्धार आपण केला पाहिजे. व्यवसाय करता येईल, रोजगार करता येईल असे शिक्षण द्यावयाचे आहे.

शिक्षणाच्या बाबतीत आम्ही आणखी एक गोष्ट करणार आहोत, ती म्हणजे आपल्या भागात ज्या काही आश्रमशाळा आहेत आणि गाव पाडयात ज्या काही अंगणवाडया आहेत त्यांचा विकास.

आता प्रत्येक गाव-पाडा किंवा वाडीवर अंगणवाडी किंवा मिनी अंगणवाडी असतेच. त्यामध्ये मुलांना खाऊ दिला जातो. कधी खिचडी तर कधी उसळ. बऱ्याचशा अंगणवाडयावर खाऊ वाटपाशिवाय काहीच होत नाही. तिथं आपल्या मुलांना गाणी गोष्टी सांगितल्या गेल्या पाहिजेत. खेळ खेळायला मिळाले

पाहिजेत, त्यांच्यावर चांगले संस्कार झाले पाहिजेत, त्यांना शिकायला मिळाले पाहिजे. या गावपाडयावर हे होत असेल तर ती चांगलीच गोष्ट म्हटली पाहिजे, पण जर का ते होत नसेल तर या कार्यक्रमाच्या माध्यमातून आपण या गोष्टी करणार आहोत. तसेच अंगणवाडीमध्ये गर्भवती व स्तनदा मातांना सकस आहार मिळतोय ना हे बघणार आहोत. शासनाने आपल्यासाठीच अंगणवाडया उघडल्या आहेत. सा-या जगभरात फक्त आपल्याच देशात एवढा मोठा हा अंगणवाडीचा कार्यक्रम चालतो. तो आपल्या गावातही नीट चालला पाहिजे. त्यासाठी गावातल्या अंगणवाडी सेविकेला तुम्ही आम्ही मिळून मदत करायची आहे.

आपल्या परिसरामध्ये ५-१० किलोमीटरच्या परिसरात आश्रमशाळा आहे. या आश्रमशाळेचा विकास केंद्र म्हणून आपण उपयोग करुन घेणार आहोत. शाळेत शिकत असलेल्या मुलांना चांगले दर्जेदार शिक्षण मिळावे, म्हणून आम्ही प्रयत्न करणार आहोत. शिक्षणातल्या काही त्रुटी असतील तर त्या शासनाच्या मदतीनं दूर करणार आहोत. आता प्रत्येक आश्रमशाळेत कॉम्प्युटर आलेले आहेत. या कॉम्प्युटरमध्ये माहितीचा खजिना आपण साठवू शकतो. त्याचा उपयोग शाळेतल्या आपल्या मुलांना तर होईलच पण तुम्हालाही होऊ शकेल.

आम्ही अशी योजना करणार आहोत की, तुम्हाला कामासाठी जी काही माहिती लागेल ती त्या कॉम्प्युटरमध्ये साठवून ठेवणार. आता समजा तुम्हाला आदिवासी विकास विभागाच्या योजना समजावून घ्यायच्या असतील तर तुम्ही आश्रमशाळेत जायचं आणि कॉम्प्युटरचे बटण दाबलं की तुम्हाला शेतकऱ्यांसाठीच्या योजना कुठल्या, तरुणांसाठी, महिलांसाठी योजना कुठल्या? कागदपत्रं कोणती जोडायची? वगैरे गोष्टी कळू शकतील. एवढंच काय, त्याचा अर्ज देखील मिळण्याची सोय करणार आहोत. तसेच शासनाशी बोलून आम्ही अर्ज तिथंच भरुन, तिथंच घेण्याची पण सोय करणार आहोत. या गोष्टींना थोडा वेळ लागेल पण निश्चित होतील.

याच आश्रमशाळेत तुम्हाला जगात काय काय चालले आहे, काय काय कसं कसं असतं त्याचं प्रात्याक्षिक तुम्हाला तिथं बघायला मिळू शकेल. आता तुम्ही गांडूळ खताचे नाव ऐकलं असेल तर, हे खत कसं तयार करायचं, त्याचे उपयोग काय याची सविस्तर माहिती तुम्हाला तिथं मिळू शकेल. त्याचबरोबर शोषखड्डा कमी खर्चातला संडास, परसबाग, औषधी वनस्पतींची लागवड, पिकांच्या सुधारित जाती गोष्टींची माहिती व प्रात्याक्षिक देखील तुम्हाला तिथ बघायला मिळेल. याचा फायदा असा की तुम्हाला इथून गावातून/ पाडायातून उठून सारखं प्रकल्प अधिकाऱ्यांच्या ऑफिसमध्ये जायला नको. तुमचा वेळ, पैसा वाचेलच तुम्हाला सारखे कामासाठी हेलपाट घालावे लागणार नाहीत आणि तुम्हाला अगदी तुमच्या गावाजवळ माहिती उपलब्ध होईल.

आपल्याला माहीतच आहे की पूर्वी आदिवासी जंगलावरच अवलंबून होते. जंगलातून त्याला अन्न मिळायचं, कुठे शिकार कुठं आणखी काही. जंगलातील फळं, मध, डिकं व इतर वस्तू गोळा करुन बाजारात नेऊन त्याबद्दल मीठ, मिरची आणत असे. हळूहळू आदिवासी शेतीकडे वळला. इतरांचं बघून तोही शेती करायला लागला. पण जमीन अशी ओबडधोबड, डोगराच्या उतारावर व जंगलात असल्याने तिथं फारसं काही होतच नाही. वर्षातून फक्त एकच पीक. तेही पावसाच्या भरवशावर अवलंबून. पाऊस कमी जास्त झाला की ते हातचं जातं. कधी पीक चांगलं आलं तरी

रोग पडला की सगळंच संपतं. शेतातलं उत्पादन वर्षभर काही संपूर्ण कुटुंबाला पुरु शकत नाही. बरोबर आहे ना?

शेतीच्या अशा परिस्थितीमुळे मग बाहेरगावी मोलमजुरीसाठी जावं लागतं. ज्याचयाकडं जमीन नाही ते तर दिवाळी झाली की लगेचच बाहेर पडतात. आठ महिने बाहेर काम करुन पावसाळयाच्या वेळेलाच परततात. कुठं काही, सरकारची कामं निघाली तरच आपल्याला काहीतरी काम मिळते. आपलं पोट हातावरच असतं. हात चालेल तर पोटाला मिळणार, नाहीतर मग कुठं आंबिल पिऊन किंवा कंद खाऊन दिवस काढावे लागतात. ही परिस्थिती आपल्या राज्यातल्या जवळजवळ सर्वच आदिवासी भागातून दिसून येते.

पण मग यावर उपाय काय? आपण तसंच बसून रहायचं का? कोणीतरी येईल, आपल्याला मदत करेल, या आशेवरच जगत राहायचं का? तुम्हीच विचार करा.

आम्हाला असं वाटतं की या परिस्थितीतून मार्ग काढला पाहिजे आणि तुम्ही जर का या कामी पुढाकार घेतला तर ते होऊ शकेल आणि त्यामुळे तुमची निश्चितच प्रगती होईल.

आपल्या राज्यातल्या, देशातल्या इतर अनेक भागातल्या लोकांनी निरनिराळया गोष्टींची मदत करुन स्वत:चा विकास करुन घेतला आहे. आपणही ते काम करु शकतो. त्यासाठी आपल्याला आपण जी सध्याची शेती करतो, त्यात बदल करुन सुधारित पध्दतीने करायला लागेल. सुधारित बियाणे, सेंद्रिय खते वगैरेचा वापर करायला लागेल. शेतीबरोबरच इतरही गोष्टीकडे लक्ष देता येऊ शकेल. करवंद, जांभूळ, चारोळी आंबा, काजू, चिक्कू, आवळा, डाळिंब, सीताफळ, शेवगा यासारख्या फळझाडांची लागवड आपण करु शकू. शासनाच्या त्यासाठी योजना पण आहेत. पावसाळयात जे पाणी वाहून जाते, ते जर का कच्चे बंधारे टाकून अडवले तर त्या पाण्यावर भाजीपाला होऊ शकतो. शेळीपालन, कोंबडीपालन, वराहपालन, ससेपालन अशा गोष्टीपण आपण करु शकतो.

आपल्या आजूबाजूला जंगल आहे. कुठे डिंक, मध आहे, कुठं मोहाची फुलं आहेत, तर कुठं आणखी काही. आपण हे सर्व जर का गोळा करुन त्यावर प्रक्रिया करुन विकलं तर त्याला चांगलाच भाव मिळेल. त्यासाठी तुमचीच सहकारी सोसायटी स्थापन करता येऊ शकेल.

आदिवासी उत्थान कार्यक्रमांतर्गत या कामी आम्ही आपल्याला माहिती देऊन मार्गदर्शन करु. त्यासाठी शासनाचे निरनिराळे अधिकारी बोलावून शासनाच्याच ज्या काही योजना आहेत त्यांची माहिती करुन देऊ . त्यासाठीची प्रकरणं आपल्याला करता येतील. जे शासनाच्या माध्यमातून शक्य नसेल ते इतर माध्यमातून कसे काय करुन घेता येईल ते आपण पाहू.

या सगळया गोष्टी हळूहळूच होऊ शकतील. एकदमच करायला आमच्याकडे जादूची कांडी नाही; पण या गोष्टी निश्चितच होतील. त्यासाठी तुमची साथ मात्र पाहिजे.

आपला गाव-पाडा कुठल्या तरी ग्रामपंचायतीला जोडलेला आहे. कुठं छोटया ग्रामपंचायती आहेत, तर कुठं मोठया. शासनाच्या ज्या काही विकास योजना असतात, मग त्या राज्य शासनाच्या असोत वा केंद्र शासनाच्या. सगळया योजना ग्रामपंचायती मार्फतच

राबवण्यात येतात. म्हणूनच या कार्यक्रमात आम्ही ग्रामपंचायत हा घटक धरूनच काम करणार आहोत.

आता या ग्रामपंचायतीत सरपंच, उपसरपंच व सदस्यांना माहिती असतात. शासनाच्याच आकडेवारीप्रमाणे आदिवासी विकासाचा ३६० योजना आहेत. किती? ३६० पण त्यापैकी किती योजना सरपंचाना किंवा सदस्यांना माहिती असतात. फारच थोडया. या ३६० योजनांपैकी काही योजना चालू आहेत, तर काही बंद. काही महिलांसाठी तर काही मुलांसाठी, शेतकऱ्यांसाठी तर काही तरुणांसाठी. या योजनांबद्दल आपल्याला काहीच माहीत नसते. आणि माहिती नसते म्हणून आपण अर्ज कसा करणार, त्याचा लाभ कसा मिळवणार ? त्यासाठी आम्ही असं ठरवलं आहे की, आम्ही ग्रामपंचायतीतले सर्व सदस्य मग त्यात सरपंचही आलेच यांना पंचायत राज शासकीय योजना याबाबत प्रशिक्षण देणार, माहिती देणार, शिकवणार. या कार्यक्रमातून खासकरुन महिला ग्रामपंचायत सदस्यांना तयार करणार आहोत. मग हीच लोकं तुमच्यापर्यंत शासनाच्या विविध योजनांची माहिती पोचवतील. केंद्र शासनानं ७३ वी घटनादुरुस्ती करुन आदिवासी भागातील ग्रामसंभांना खास अधिकार दिले आहेत. मात्र त्यांची अंमलबजावणी नीटपणे होऊ शकली नाही. त्याची माहिती देण्याचे काम आम्ही करणार आहोत.

आज सगळीकडे देशभरात बचत गटाच्या माध्यमातून लोकांना खासकरुन महिलांना संघटित करुन, त्यांना बचत करायला लावून त्यामार्फत विकास करण्याचे प्रयत्न होत आहेत. अनेक ठिकाणी ते यशस्वी देखील झाले आहेत. तुमच्या गावपाडयातही अंगणवाडीच्या माध्यमातून, शासनाच्या व संस्थेच्या माध्यमातून बचत गट स्थापन झाले असतील. जर का हे बचत गट चांगल्याप्रकारे चालू असतील तर चांगलंच आहे. मात्र बंद असतील तर आपल्याला ते पुन्हा सुरु करता येतील. जिथं नाहीत तिथं आपण ते करु. फक्त महिलांचेच नाहीत तर पुरुषांचे देखील बचत गट आपण स्थापन करणार आहोत.

आपल्या गाव/पाडयात तरुण मंडळ, किशोरी मंडळ, शेतकरी मंडळ या सारखे निरनिराळे गट स्थापन करुन त्यामार्फत आपल्या गावात चांगले उपक्रम राबविता येतील. तसंच तुम्ही सांगितलंत तर आपण गावात वाचनालय सुरु करु शकतो. वाचक मंडळ चालवू शकतो. या वाचनालयात गोष्टींची, शेतीची, आरोग्याची व इतर अनेक प्रकारची पुस्तके मासिके ठेवण्याची सोय करता येऊ शकेल. त्याकामी आम्ही तुम्हाला मार्गदर्शन करु. मात्र हे जे काही बचत गट, मंडळे वाचनालये वगैरे इथं होईल. त्यासाठी तुमचा पुढाकार आणि सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक आहे. आम्ही तुम्हाला दिशा दाखवण्याचं, माहिती पुरवण्याचं काम करु. या आदिवासी उत्थान कार्यक्रमाचा आणखी एक महत्वाचा उद्देश आहे, आणि तो म्हणजे तुमचा सांस्कृतिक वारसा जपण्याचा, टिकवून ठेवण्याचा. तुमच्या समाजाची खास एक संस्कृती आहे. तिथं स्वत:चं एक वेगळेपपण असतं. त्यात मग तुमच्या देव-देवता आल्या. सण, समारंभ, तुमची नाच गाणी, लोक कला आहेत. तुमचं पारंपरिक ज्ञान आहे ते तुम्ही जपून ठेवले पाहिजे, नाहीतर काळाच्या ओघात काय लागेल ती मदत आम्ही करु आणि हे काम जर का झाले तरच आपली संस्कृती टिकू शकेल.

आतापर्यंत आम्ही खूप बोललो. त्यामुळे तुम्हाला आदिवासी उत्थान कार्यक्रम काय आहे, हे तुमच्या लक्षात आले असेल.

(पृष्ठ क्र. ४६ वर पहा)

प्रशिक्षणाचे आयोजन व स्वयंसेवकाचा सहभाग कसा असावा?

१. पूर्ण वर्षाच्या प्रशिक्षण विषयांचे नियोजन करावे. साधनव्यक्ती म्हणून तालुका किंवा काही वेळेस जिल्हा पातळीवरील साधनव्यक्तींना बोलवावे, जेणेकरुन या साधनव्यक्तींचा, स्वयंसेवकांचा नियमित संपर्क राहिल. उदा. काही संस्था म्हणजे, प्रकल्प अधिकारी कार्यालय, पंचायत समिती, प्रा. आ. केंद्र वा उपकेंद्र, कृषीखाते, पशुसंवर्धन खाते, वनखाते किंवा आश्रमशाळा इ.

२. शिबीर स्थळ, स्वंयसेवकांना येण्या-जाण्या साठी सोयीचे असावे.

३. शिबीर स्थळामध्ये सतरंजी, पिण्याचे पाणी, प्रथमोपचार पेटी, जेवणाची व्यवस्था असावी. कॅमेरा असावा.

४. प्रत्येक स्वयंसेवकाजवळ वही पेन द्यावे.

५. प्रकल्पाच्या नावाचा बॅनर लावावा. सोबत कॅमेरा ठेवावा.

६. एक दिवसांच्या प्रशिक्षणाचे नियोजन करावे. प्रशिक्षणाची तारीख पुणे कार्यालयास कळवावी. यात किती वेळ साधनव्यक्ती बोलणार, नंतरच्या सत्रास कामाचे नियोजन, पुढील कामाची दिशा स्पष्ट करणारे वेळापत्रक, प्रकल्प समन्वयकाचे, गावभेटीचे वेळापत्रक स्वयंसेवकाशी बोलून तयार करावे.

७. शासनाच्या विविध यंत्रणेचे, आपल्या कामाकरिता सहकार्य कसे घेता येईल ते पहावे. काही संयुक्त उपक्रमांच आयोजन करावे. उदा. आरोग्य शिबीर, पशुधन विकास शिबीर, जनावरांचे लसीकरण, फलोत्पादनविषयी माहिती.

८. शिबीराच्या उत्तरार्धात स्वयंसेवकांना अनुभव कथन करण्यास सांगावे यात यशस्वी गोष्टी, कामात आलेल्या अडचणी, कॅलेंडरमधील माहिती, पाडा किंवा गावस्तरावरील आलेला शासकीय कर्मचाऱ्यांशी संपर्क, कर्मचाऱ्यांना काही मदत केली का? स्थानिक लोकांचा सहभाग घेतला जातो का? ते बघणे.

९. प्रशिक्षणात घेतलेल्या विषयांच्या माहितीची गावामध्ये कोणत्या प्रकारे अंमलबजावणी करता येईल ते स्वयंसेवकाना विचारून ठरवावे.

१०. स्वयंसेवकांना मानधन देण्याअगोदर त्यांना या कामामागील व त्यांचे योगदान किती महत्त्वाचे आहे त्याची सतत माहिती करुन द्यावी.

११. समन्वयक व सहाय्यकांनी आपल्या वागण्या बोलण्यातून स्वयंसेवकासमोर आदर्श उभा करावा, व्यवस्थित बोलावे, सर्वांचा मान राखावा, प्रत्येकाला समजावून घ्यावे व समजावून सांगावे. सर्व हिशोब चोख असावे.

१२. प्रशिक्षणात घेतलेल्या विषयावर टिपण तयार करावे. झालेल्या चर्चेचा ऊहापोह करावा.

१३. शिबीरामध्ये प्रार्थना, गाणी, काही खेळ व गटचर्चेचा समावेश असावा. त्यामुळे पूर्ण दिवसभर स्वयंसेवक उत्साही राहतात. तसेच स्वयंसेवकांनी समोर येवून अनुभवकथन करावे. त्यामुळे त्यांना प्रोत्साहन मिळते. बोलण्याची संधी मिळते व कामाचा हुरुपही वाढतो.

१४. काही लोकांना वैयक्तिक बोलायचे असल्यास त्यांना बाजूला घेवून बोलावे.

१५. गुटखा, तंबाखू , मावा व विडीकाडी याला पूर्ण मज्जाव असावा.

१६. वैयक्तिक नाव घेवून दोषारोप करु नये. तर प्रशिक्षणात चांगल्या कामाचे, त्या व्यक्तीचे नाव घेवून कौतुक करावे.

१७. समन्वयक व सहाय्यकाने, स्वयंसेवकांची आपुलकीने चौकशी करावी. त्याला कार्यप्रवण कसे करता येईल ते पहावे.

१८. स्वयंसेवकासमोर चोख व पारदर्शी व्यवहार ठेवावा. त्यांना आपल्या कामाविषयी, आर्थिक बाबींविषयी कोणताही संशय वाटणार नाही याची दक्षता घ्यावी.

१९. स्वयंसेवक, गावातील विकासकामांचा आधारस्तंभ आहे. हे त्याच्या मनावर बिंबवावे.

२०. स्वयंसेवकांसोबत कोणत्याही प्रकारे वैयक्तिक पातळीवर आर्थिक व्यवहार करु नयेत. व्यसने करु नयेत. धान्य, भाजीपाला अथवा तत्सम गोष्टी घेतल्यास त्याचा मोबदला द्यावा.

२१. स्वयंसेवक, महिलांशी सभ्य वर्तन करावे.

२२. स्वयंसेवक, मार्गदर्शक, सहाय्यक यांनी कायद्याच्या कचाटयात सापडू नये. याकरता दक्षता घ्यावी.

२३. प्रशिक्षणातील विषय आपल्या घटकांशी निगडीत असावेत. स्वयंसेवकांना सर्वांगीण ग्रामविकासाबद्दल सातत्याने मार्गदर्शन करावे.

प्रशिक्षणाचे वार्षिक नियोजन कसे करावे ?

स्वयंसेवकांना खालील विषयांवर घटकनिहाय प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

घटक	प्रशिक्षणाचे विषय
Livelihood & Income Generation Activities उदरनिर्वाह-उपक्रम	फलोत्पादन, आदर्श शेती, सेंद्रीय खताचा वापर कसा करणार, पिकांचे बाजारभाव कसे काढणार, तर सोयाबीन, कपाशी इ. पिकांच्या जाती याविषयी झालेले संशोधन. नवीन बी बियाणांबद्दल शासनाच्या आदिवासींबद्दल काय योजना आहेत. बांधावरची शेती, औषधी वनस्पतींची माहिती इ. मधु मक्षिका पालन, पशुधन विकासामध्ये शेळीपालन, कुक्कुटपालन, गडचिरोलीसारख्या ठिकाणी असणारे वराहपालन, यांच्यातील चांगल्या जाती. त्या गावठी जातीवर संकर करणे शक्य आहे का? सध्या आहे

	त्या जातींचे लसीकरण. पशुधन पर्यवेक्षकास बोलावणे. वेळापत्रक (वार्षिक) तयार करणे. प्रत्येक गावाच्या लसीकरणाचे वेळापत्रक कसे आखावे. गावातील पशुधन संख्या कशी काढावी. खादी ग्रामोद्योग मंडळाच्या योजनांची माहिती रोजगार हमी व पाणलोट क्षेत्राची माहिती देणे व प्रशिक्षण जनावरांना लसीकरण कसे करावे त्याचे प्रशिक्षण देणे. त्याचे किट घेणे. व त्याचा मोबदला घ्यावा. रोपवाटिका शेती, वनशेती, पाणलोट क्षेत्र विकास या योजनांसाठीची सरकारी यंत्रणेची माहिती देणे. या यंत्रणा कशा काम करतात. शासनाचा सहभाग घेणे.
Community Development समुदाय विकास	पंचायतराजचे ट्रेनिंग पंचायत समितीच्यावतीने आयोजित करणे. ग्रामपंचायतीची कार्ये, ग्रामसभा, ग्रामपंचायत सदस्य रचना, ग्रामसभेचे अधिकार, योजनांची अंमलबजावणी कशी करणार. ग्रामपंचायती कारभारात लोकांचा सहभाग कसा घेणार? गायरान जमिनीवरील कुरणपिक शोषखड्डे निर्धूर चूली, शौचालय, उर्जाविषयक साधने कोणती वापरावीत. महिला मंडळ व त्यांची कार्ये स्वयंसहायता गट, शेतकरी मंडळ, युवक मंडळ, किशोरी मंडळ, वाचनालये इ. प्रशिक्षण
प्रशिक्षण व मार्गदर्शन	दाई, वैदू व भगत यांची यादी करणे/त्यांच्या औषधांची माहिती त्यांना देणे, एकात्मिक बाल विकास यंत्रणा, आश्रमशाळा, पंचायतराज यंत्रणांची माहिती देणे. युवक-युवतींसाठी प्रशिक्षण कसे आयोजित करणार.

सांस्कृतिक वारसा व अस्मिता	स्थानिक कलाकारांच संघटन, त्यांची नाव, कोणती वाद्य वाजवतात त्याची माहिती गोळा करणे. कलापथक जर असतील त्यांचे नाव काय? त्या कलापथकाची काय खासियत. कलापथक नसल्यास ते स्थापन करणे. लोकांच्या नावाची यादी वर्षभरात ते कोणकोणत्या प्रसंगात वाजवतात ते बघणे त्यांचा सराव. अंधश्रद्धा विषयक जाणीव जागृती प्रशिक्षण द्यायला हवे. लोककलांचा वापर, स्थानिक इतिहासाच्या वारशाची जपणूक कशी करणार.
शिक्षण	अंगणवाडी व प्राथमिक शाळांची यंत्रणा समजावून घेणे. अंगणवाडी कर्मचाऱ्याचे नाव. अंगणवाडी मध्ये मुले दाखल करणे. अंगणवाडीत कोणकोणते रजिस्टर ठेवली जातात व कशी. आहाराच नियोजन कस असते. अंगणवाडी व परिसर कसा असावा. अंगणवाडी सेविका व प्रा. शि. शी कसा समन्वय साधावा. शाळेची यंत्रणा वापरून प्रौढ शिक्षण वर्ग कसा चालविणार. आदिवासी विकास योजनांची माहिती देणे. व्यावसायिक शिक्षणावर कसा भर देणार
आरोग्य	अ) प्रजनन व बाल आरोग्य : गर्भवती स्त्रिया व स्तनदा मातांची काळजी, सुरक्षित बाळंतपण, नवजात बाळाची व लहान मुलांची काळजी, भरणपोषण, लसीकरण, किरकोळ आजारांवर उपचार. किशोरवयीन मुलामुलींचे आरोग्य शिक्षण, पाणी व स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता. ब) आजार नियंत्रण : सर्वसामान्य साथीच्या आजारांवर उपचार, क्षयरोग, कुष्ठरोग, हिवताप यासारख्या आजारांवर नियंत्रण, डोळ्यांची निगा, मोतीबिंदू, आंधळेपणा यासारख्या आजारांवर नियंत्रण

	क) पोषण व आहार : परसबाग, वनोषधींची लागवड, गर्भवती व स्तनदा माता, लहान मुले यांच्यासाठी पोषण व आहार विषयक शिक्षण. स्थानिक, पारंपारिक पोषक आहाराला प्रोत्साहन. आजारावर उपचारांसाठी पारंपारिक वनौषधीच्या वापरासाठी भगत व वैदूंना प्रोत्साहन.
इतर कौशल्य	१. सर्व स्तरावरील लोकांशी संवाद कसा साधावा. संवाद कौशल्ये, सभा, बैठका २. ज्या स्वयंसेवकांना लिहता वाचता येत त्यांना अहवाल लेखन कसे करावे याविषयी मार्गदर्शन ३. रेकॉर्ड किपिंग व आरोग्य किट किपिंग ४. सल्ला व मार्गदर्शन कसे करावे. ५. अभिनय कौशल्यातून व्यक्तिमत्त्व विकास कसा करावा ६. Story Telling Skills ७. खेल, गाणी, गप्पा, गोष्टी, पारंपरिक नृत्य कौशल्य, झिम्मा-फुगडी ८. पपेट शो/सादरीकरण ९. अंधश्रद्धा निर्मूलन प्रात्यक्षिक

(पृष्ठ क्र. ४० वरुन पुढे)

या कार्यक्रमाला आपल्या राज्य शासनानेच मदत केली आहे आणि शासनाच्या भागीदारीनेच आमच्या दोन संस्था काम करणार आहेत. या कार्यक्रमातून तुमच्यातल्याच लोकांना माहिती, प्रशिक्षण देऊन तयार करणार आहोत. या कार्यक्रमात तुम्हा लोकांचा मोठा सहभाग राहणार आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ आपल्याला कसा घेता येईल हे आपण बघणार आहोत. गावातली अंगणवाडी तसेच परिसरातील आश्रमशाळा यांना विकास केंद्र बनवून त्यामार्फत आपण बदल घडवणार आहोत.

एक मात्र निश्चित की, या कार्यक्रमातून कुठल्याही पैशाची मदत किंवा कर्ज कोणालाही दिले जाणार नाही. जे काही असेल ते संपूर्ण गाव वा पाडयासाठी असेल. शासनाच्या योजना लोकांसाठी राबवायचा हा प्रकल्प आहे.

राज्य शासनाने या कार्यक्रमाद्वारे आपल्याला आपला गाव/पाडा/वाडी चा विकास करुन घेण्याची संधी दिली आहे. तुम्ही आम्ही, आपण सगळे मिळून आपल्या विकासासाठी जोरदार प्रयत्न करुन या संधीचा सोन्यात रुपांतर करु या ! आणि साऱ्या जगाला दाखवून देऊ की आमचा आदिवासी गाव / पाडा विकासाच्या बाबतीत मागे नाही.

धन्यवाद !

(पृष्ठ क्र. २४ वरुन पुढे)

५.१ कार्यक्रमाचा प्रभाव

१. आदिम जमातीसहीत सर्व आदिवासींच्या जीवनात गुणात्मक सुधारणा.

२. अन्न पुरवठ्याची हमी मिळेल आणि स्थलांतर कमी होईल.

३. सांसर्गिक रोगांमुळे होणारे बाल आजार आणि बालमृत्यू कमी होतील.

४. विकास कार्यक्रमातील स्त्रियांचा सहभाग वाढेल.

५. आदिवासी समाजाचे विशेषत्वाने स्त्री समाज घटकांचे सबलीकरण होईल.

६. आदिवासींच्या सांस्कृतिक अस्मितेचे वर्धन होईल.

७. शाश्वत आणि पुन: प्रतिकात्मक विकासाचे प्रतिमान तयार होईल.

□ □ □

शासन-स्वयंसेवी संस्था सहकार्य

प्रस्तावना -

आपणा सर्वांना कल्पना आहेच की आदिवासी उत्थान कार्यक्रमाचे ध्येय, सर्वांगीण विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून आदिवासी समाजास आत्मविश्वास, आत्मसन्मान व अस्मिता मिळविण्यास मदत करणे असे आहे व त्यादृष्टीने मागील एक वर्षापासून प्रकल्पाची वाटचाल सुरु आहे. आदिवासी उत्थान कार्यक्रमाची अंमलबजावणी आदिवासी विकास विभाग, पंचायत समिती तसेच राज्य शासनाच्या अन्य विभागांच्या सहयोग व सहकार्यातून केली जात आहे. हे पवित्र कार्य करताना यंत्रणांचे सहकार्य घेणे अपेक्षित आहे व त्यातूनच आदिवासींच्या सर्वांगीण व शाश्वत विकासाचे प्रतिमान विकसित होईल.

Networking म्हणजे नेमके काय करायचं ?

- संबंधित खात्याशी नियमित संपर्क ठेवणे
- कार्यालयीन व फील्ड यंत्रणा समजावून घेणे
- सरकारी योजनांची माहिती घेणे. संबंधित योजनांची अंमलबजावणी आपल्या कार्यक्षेत्रात करणे शक्य आहे का? ते तपासून पाहणे.
- सरकारी अधिकारी/कर्मचारी यांच्याशी परिचय, त्यांची नाव, पद व दूरध्वनीचा तपशील ठेवणे.
- येत्या उन्हाळ्याचा विचार करता - रोपवाटिका, रोजगार हमी योजनांची काम, वनीकरणाची पूर्वतयारी (Soil आणि Water Conservation), लसीकरण, बोरीवर डोळे भरणे प्रशिक्षण इ. उपक्रम त्यांच्यावतीने राबविणे शक्य आहे का? ते बघणे.
- पाणलोट क्षेत्र विकासाचे कार्यक्रम घेणे शक्य आहे का? याची चाचपणी करणे
- प्रकल्प कार्यालय व अढउ कार्यालय यांना नियमित आकडेवारी पाठविणे (रिर्पोटसह)
- संबंधित खात्याअंतर्गत असणाऱ्या अंदाजपत्रकांविषयी विशेषत: त्यातील पूर्ण होणाऱ्या योजनांची आपल्याला माहिती होण गरजेचे आहे.
- अंदाजपत्रीय तरतूद असणारी कामे, संबंधित यंत्रणेकडून घेणे शक्य आहे का ते बघावे. असे काम शासकीय मदतीने व्हायला हवी.
- संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्याला प्रशिक्षणास बोलवावे. काही वेळेस गावभेटी करता बोलवावे. शासकीय अधिकाऱ्यासोबत गाव बैठकांचे आयोजन करावे. यामुळे गावावर त्याचा चांगला परिणाम जाणवतो.
- काही नवीन उपक्रम राबविल्यास शासकीय कर्मचाऱ्यांना उद्घटनासाठी बोलावणे.
- सरकारी कार्यालयात स्थानिक लोकांना/स्वयंसेवकांना घेवून जाणे व त्यांना संबंधित यंत्रणेचा परिचय करुन देणे.

  उदा. खालील शासकीय विभागांशी नियमित संपर्क असावा.

१. आदिवासी प्रकल्प कार्यालय - प्रकल्प अधिकारी

२. पंचायत समिती -सभापती-गटविकास अधिकारी

३. तहसीलदार कार्यालय - तहसिलदार

४. उपजिल्हा रुग्णालय - अधिक्षक

५. प्राथमिक आरोग्य केंद्र - वैद्यकीय अधिकारी

६. वनखाते - वनसंरक्षक

७. फलोत्पादन खाते - अधिक्षक/संचालक

८. कृषी खाते - अधिक्षक/संचालक

९. रोजगार हमी योजना - अभियंता

१०. आमदार/खासदार/सरपंच/ग्रामपंचायत सदस्य/ तलाठी/ग्रामविकास अधिकारी

११. सार्वजनिक बांधकाम खाते

१२. महिला व बाल कल्याण खाते-संचालक

१३. TC/ATC कार्यालय (जिल्हा स्तरावरील)

१४. पशुसंवर्धन खाते

१५. कृषी खात्याच शेतकरी प्रशिक्षण संस्था

१६. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ

१७. फिल्ड पब्लिसिटी ऑफीस

१८. फूड अ‍ॅन्ड न्युट्रीशन एक्सटेंशन सेंटर

टिप : वरील मुद्दे लक्षात घेऊन संबंधित विषय plan of action मध्ये लिहून त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

• • •